# रोजगार हमी योजना समिती

## (२०१२-२०१३)

सत्यमेव जयते

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## बाविसावा अहवाल

(नांदेड जिल्ह्याच्या संबंधात)

(अहवाल दिनांक १५ एप्रिल २०१३ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

*

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१३

# रोजगार हमी योजना समिती

## (२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## बाविसावा अहवाल

(नांदेड जिल्ह्याच्या संबंधात)

(अहवाल दिनांक १५ एप्रिल २०१३ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

एचबी २९४३—१

## रोजगार हमी योजना समिति
## (२०१२-२०१३)

**समिती प्रमुख**

(१) ॲड. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.
(३) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.
(४) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(६) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
(७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(८) श्री. शिवेंद्रसिंह राजे भोसले, वि.स.स.
(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.
(११) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
***(१२) श्री ए. टी. पवार, वि.स.स.
*(१३) डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.
*(१४) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
*(१५) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
*(१६) प्रा. अतुल देशकर,वि.स.स.
(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
(१८) कॅ. अभिजीत अडसूळ, वि.स.स.
(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.
(२०) श्री. प्रविण दरेकर, वि.स.स.
(२१) श्री. सुभाष चव्हाण वि.प.स.
(२२) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(२३) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
*(२४) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२५) श्री. भगवान साळुंखे, वि.प.स.
**(२६) डॉ. दिपक सावंत, वि.प.स., निर्मंत्रित

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. यु. के. चव्हाण, सहसचिव,
(३) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव, (समिती).

---

**टीप.–** * डॉ. खुशाल बोपचे, सर्वश्री हरिष पिंपळे, संजय भेगडे व प्रा. अतुल देशकर, वि.स.स. यांची दिनांक २५ जुलै २०१२ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

** डॉ. दिपक सावंत, वि.प.स. यांची दिनांक २७ ऑगस्ट २०१२ रोजी मा.सभापतीनी निमंत्रित सदस्य म्हणून फेर नामनियुक्ती केली.

*** श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांच्या ऐवजी श्री. ए. टी. पवार,वि.स.स. यांची दिनांक ७ जानेवारी २०१३ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

# रोजगार हमी योजना समिति
## (२०१०-२०११)

**समिति प्रमुख**

(१) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(३) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

(४) श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.

(५) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.

(६) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.

(७) श्री. सिताराम घनदाट, वि.स.स.

(८) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.

(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.

(११) श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.

(१२) श्री. राजीव देशमुख, वि.स.स.

(१३) श्री. दादाराव केचे, वि.स.स.

(१४) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

(१५) श्री. सिद्रामप्पा पाटील, वि.स.स.

(१६) श्री. शिवाजी कर्डिले, वि.स.स.

(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.

(१८) श्री. संजय राठोड, वि.स.स.

(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.

(२०) श्री. मंगेश सांगळे, वि.स.स.

(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

*(२२) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(२४) श्री. केशवराव मानकर, वि.प.स.

**(२५) रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. यु. के. चव्हाण, सहसचिव,

(३) श्री. विलास आठवले, उप सचिव,

(४) श्री. श्रीकांत शेटे, कक्ष अधिकारी.

---

**टीप.—*** श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स. यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै २०१० रोजी समाप्त झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अनिल तटकरे, वि.प.स. यांची दिनांक १५ ऑक्टोबर २०१० रोजी मा. सभापतींनी सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे.

** श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिनांक ७ जानेवारी २०११ रोजी त्यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने अनुक्रमांक २५ वरील पद रिक्त दर्शविण्यात आले आहे.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना :** | |
| १. | कामाचे वार्षिक नियोजन . . . . . . . . . . | १ |
| २. | निधीचा पुरवठा व खर्च . . . . . . . . | १ |
| ३. | मजुरांच्या सोयीसवलतींवर करण्यात आलेला खर्च . . . . . . | ४ |
| ४. | मजुरीचे वाटप . . . . . . . . . . | ५ |
| ५. | अपूर्ण कामे . . . . . . . . . . | ९ |
| ६. | गैरव्यवहाराची प्रकरणे . . . . . . . . | १५ |
| ७. | सिंचन विहिरी . . . . . . . . | १६ |
| | **परिशिष्ट :** | |
| | (एक) अपूर्ण कामे . . . . . . . . . . | १९ |
| | (दोन) गैरव्यवहाराची प्रकरणे . . . . . . . . | ४७ |
| | (तीन) बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त . . . . . . . . | ६१ |

## प्रस्तावना

मी, रोजगार हमी योजना ''समितीचा प्रमुख'' या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीचा बाविसावा अहवाल सादर करीत आहे.

मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद, यांनी अनुक्रमे दिनांक ३१ मे २०१२ व १ जून २०१२ रोजी नियुक्त केलेल्या सदस्यांची सन २०१२-२०१३ या वर्षासाठी समिती गठीत केली. यापूर्वीच्या समितीने दिनांक १७ व १८ ऑगस्ट २०११ रोजी नांदेड येथे झालेल्या बैठकीमध्ये समितीने पाठविलेली प्रश्नावली व जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने रोहयोच्या कामात आलेल्या त्रुटी तसेच रोहयो अंतर्गत कामे करणा-या मजुरांना आलेल्या अडचणी व ही योजना राबवितांना कार्यान्वयीन यंत्रणांना आलेल्या उणीवा व अडचणी याबाबत लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्ह्यातील रोहयोची कामे करणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली.

जिल्हा बैठकींमध्ये समितीसमोर आलेली प्रकरणे व कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच त्यांनी कामांच्या पूर्ततेसंबंधी दिलेल्या आश्वासनासंदर्भात प्रश्नावली तयार करून ती नियोजन विभागाकडे (रोहयो) पाठवून शासनाने त्याबाबत केलेल्या पूर्ततेबाबतची माहिती त्यांचेकडून समितीने मागविली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २८ ऑगस्ट व २१ नोव्हेंबर २०१२ रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त अहवाल जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

समितीच्या कामकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल, समितीचे सर्व सदस्य, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, नांदेड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड व योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणांचे सर्व अधिकारी यांची समिती आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीच्या निमंत्रणावरून समितीच्या बैठकीस उपस्थित राहून समितीला जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने सदर अहवाल दिनांक ८ एप्रिल २०१३ रोजी विचारात घेतला व संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई
दिनांक ८ एप्रिल २०१३.

**ॲड. सदाशिवराव पाटील,**
समिती प्रमुख,
रोजगार हमी योजना समिती.

# रोजगार हमी योजना समितीचा
# अहवाल

## १. कामाचे वार्षिक नियोजन :

रोजगार हमी योजना समितीने दिनांक १७ व १८ ऑगस्ट २०११ रोजी नांदेड येथे जिल्हा बैठक घेतली. बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेत "कामाचे वार्षिक नियोजन" या संदर्भात सन २००५-२००६ च्या वार्षिक नियोजन आराखड्यामध्ये (१)जलसंवर्धनाचे २१६०० कामे, (२) पाटबंधाऱ्याची ३१८ कामे, (३) वनिकरणाची ५६३ कामे, (४) रस्ते, अंतर्गत रस्ते व शेत रस्त्याची २०९९ कामे अशी एकूण २४५८० कामांचे नियोजन केले होते. जी कामे सुरू करावयाची आहेत त्या कामांची यादी संबंधित यंत्रणांनी सादर केली असून कामांची स्थिती पूर्ण/ अपुर्ण /प्रगतीप्रथावर/भौतीकदृष्ट्या पुर्ण असल्याचे नमूद केले आहे. सन २००६-२००७ च्या वार्षिक नियोजन आराखड्यामध्ये कामे दाखविण्यात आली नाहीत. त्याचप्रमाणे सन २००७-०८ ते २०११-१२ या कालावधीतील प्रत्येक वर्षांच्या कामाचे वार्षिक नियोजन आराखडे पुस्तकात देण्यात आले नाही. तथापि, अतिरिक्त प्रश्नावलीच्या पुस्तकात सन २००६ ते २०१२ पर्यंतच्या वार्षिक नियोजन आराखड्यास त्या त्या वर्षात जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली असल्याचे नमुद केले आहे.

या जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना दिनांक २ फेब्रुवारी, २००६ पासून लागु करण्यात आली असून त्याच तारखेपासून योजनेची जिल्ह्यात प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली आहे. वास्तविक महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा मुळ उद्देश राज्याच्या ग्रामीण भागातील व्यक्तींना रोजगार पुरविणे व त्यासाठी जिल्ह्यात कामाचे वार्षिक नियोजन करणे अपरिहार्य आहे असे असतानाही उपरोक्त वर्षांच्या कामांचे वार्षिक नियोजन आराखडे पुस्तकाद्वारे समितीस सादर न केल्याने समितीस जिल्ह्यातील कामांची वार्षिक नियोजनाची स्थिती समजु शकली नाही. त्यामुळे समिती या विषयांच्या अनुषंगाने जिल्हा बैठकीत कोणताही आढावा घेवू शकली नाही. समितीने जिल्हा बैठकीबाबत संबंधिताना कळवुनही त्यांनी समितीस आवश्यक ती माहिती पुरविली नाही यावरुन संबंधित अधिकाऱ्यांनी कामाचे वार्षिक नियोजन करण्यात दुर्लक्ष केल्याचे व आपली जबाबदारी पार पाडली नसल्याचे स्पष्ट होते.

### अभिप्राय व शिफारशी :

**समितीस कामाच्या वार्षिक नियोजनाबाबतची सन २००५-०६ च्या वार्षिक नियोजन आराखड्याची माहिती सादर केली. सन २००७-०८ ते २०११-२०१२ या कालावधीतील प्रत्येक वर्षांच्या कामाचे वार्षिक नियोजन आराखडे देण्यात आलेले नसल्यामुळे समितीस जिल्ह्यांच्या कामाचे वार्षिक नियोजनाची स्थिती समजू शकली नाही व आढावा घेता आला नाही, त्यामुळे वार्षिक नियोजनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जलसंधारण, जलसंवर्धन, वनीकरण/सामाजिक वनीकरण, रस्ते व इतर कामे इत्यादी बाबींवरील नियोजनाची स्पष्ट माहिती समितीस मिळू शकली नाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. योजना राबविणाऱ्या यंत्रणांनी कामाचे नियोजन केलेले नाही तसेच यंत्रणांनी विहीत मार्गदर्शक तत्त्वानुसार कामे घेण्याचा पुरेसा प्रयत्न केल्याचे समितीला दिसून येत नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. यापुढे रोहयोच्या वार्षिक नियोजनाच्या मापदंडानुसार सर्व यंत्रणांनी कामाचे वार्षिक नियोजन करावे व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला तीन महिन्यात अवगत करावे अशी समितीची शिफारस आहे.**

## (२) निधीचा पुरवठा व खर्च.—

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक १७ व १८ ऑगस्ट २०११ रोजी नांदेड जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेत "निधीचा पुरवठा व खर्च" या संदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००६-०७ मध्ये काही यंत्रणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागणी केलेल्या निधीबाबतचा गोषवारा माहिती पुस्तिकेत देण्यात आला असून १४ कोटी १६ लाख रुपये निधीची मागणी कशाच्या आधारावर करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी नांदेड यांनी समितीला माहिती दिली की, नांदेड जिल्ह्यामध्ये दिनांक २ फेब्रुवारी २००६ रोजी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना लागू करण्यात आली. त्यावेळी रोजगार हमी योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची मागणी करण्यात आली होती. परंतु संबंधित यंत्रणांनी त्यांना प्राप्त झालेली रक्कम खर्च केलेली नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, १४ कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे आणि खर्च फक्त ३ कोटी २५ लाख रुपये झालेला आहे. उर्वरित १० कोटी ९० लाख रुपये समर्पित केलेले असल्याने ही रक्कम खर्च न होण्याची कारणे काय आहेत? नांदेड जिल्ह्यात सन २००६ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू झाली असून हा निधी रोजगार हमी योजनेचा आहे काय? तसेच ही कामे पूर्ण करून घेण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांची असतानाही या यंत्रणांनी ही कामे का पूर्ण केली नाहीत? तसेच कामे कोणत्या यंत्रणेने व किती निधीची मागणी केली होती? याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सांगितले की, नांदेड जिल्ह्यामध्ये पहिल्या टप्प्यात दिनांक २ फेब्रुवारी २००६ रोजी राष्ट्रीय ग्रामीण

रोजगार हमी योजना सुरू झाली. दिनांक १३ एप्रिल २००६ व ०३ मे २००६ या कालावधीत निधीची मागणी करण्यात आली. परंतु, नंतर त्यासंदर्भात कार्यवाही झाली नाही. हा निधी रोजगार हमी योजनेचा असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार कामाची निवड करून ग्रामपंचायतीमार्फत ५० टक्के कामे करावयाची होती. पहिल्या १०० दिवसांचा रोजगार केंद्र शासनामार्फत उपलब्ध करून द्यावयाचा आहे. त्यामुळे राज्याचा सहभाग १०१ दिवसानंतर पुढे सुरू होतो. जी जुनी कामे आहेत त्या कामांवर जास्त रक्कम खर्च झाली आहे. तसेच कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग (दक्षिण), नांदेड या यंत्रणेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे १० लाख ४४ हजार रुपयांची मागणी केली होती. या यंत्रणेला तेवढी रक्कम मंजूर करण्यात आली होती आणि त्यांनी ती रक्कम खर्च केली आहे. तसेच, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड या यंत्रणेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे १ कोटी ३४ लाख रुपये निधीची मागणी केली होती.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, काम पूर्ण करण्याच्या उद्देशाने निधीची मागणी करण्यात आली आहे. परंतु संबंधित यंत्रणांनी आपली जबाबदारी पार पाडलेली नाही. यंत्रणांनी कामे पूर्ण केली नाहीत. कार्यकारी अभियंता, ल.पा. विभाग, नांदेड या यंत्रणेने १ लाख ६४ हजार रुपयांची मागणी कशासाठी केली होती? यावर कार्यकारी अभियंता, ल.पा. विभाग, स्थानिक स्तर विभाग, नांदेड यांनी सांगितले की, अकुशल कामासाठी १ लाख ६४ हजार रुपयांची मागणी केली होती व तेवढी रक्कम खर्च झालेली आहे. तसेच शासनाकडे ५५ लाख ४६ हजार रुपयांची मागणी केली होती व तेवढी रक्कम खर्च झालेली आहे.

कार्यकारी अभियंत्यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या माहितीने समितीचे समाधान न झाल्याने समितीने विचारले की, कार्यकारी अभियंत्यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे काय? यावर अधीक्षक अभियंता, ल.पा. (स्था.स्त.),औरंगाबाद, यांनी सागितले की, तेवढीच रक्कम खर्च झाली आहे. तसेच कार्यकारी अभियंता, ल.पा., जि.प. विभाग, नांदेड यांनी सांगितले की, त्यांच्याकडील तपशिलाप्रमाणे तेवढीच रक्कम खर्च झाली आहे. याबाबत समितीने स्पष्ट केले की, या प्रश्नाच्या संदर्भात अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी समितीला असमाधानकारक उत्तर दिलेले असल्यामुळे त्यांच्यावर नियमानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात यावी असे निर्देश दिले.

जिल्हा बैठकीत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक २८ ऑगस्ट २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी प्रश्नावलीच्या माध्यमातून समितीने विचारणा केली की, सन २००६-२००७ मध्ये यंत्रणांनी मागणी केलेल्या १४ कोटी १६ लाख रक्कमेच्या निधीपैकी फक्त ३ कोटी २५ लाख रुपये खर्च झाले असून १० कोटी ८९ लक्ष इतकी रक्कम यंत्रणांनी काम न केल्याने समर्पित करण्यात आली असल्याने संबंधित यंत्रणांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली. याबाबत पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.

रोजगार हमी योजनेतंर्गत निधी मागणीच्या पद्धतीमध्ये कामाच्या निधीची पतमर्यादा मागणी यंत्रणेमार्फत जिल्हाधिकारी यांना केली जाते. जिल्हाधिकारी यांनी सदरील पतमर्यादेची मागणी शासनाकडे पाठवून पतमर्यादा शासनाकडून मंजूर करून पतमर्यादा जिल्हाधिकारी यांचेकडुन संबंधित यंत्रणेस वितरित केली जायची. एखादे वेळेस जिल्हाधिकारी यांचेकडुन पतमर्यादा मागणी न झाल्यास शासनाकडून मागील तीन महिन्यात दिलेल्या निधीचा विचार करून पुढील तिमाहीमध्ये लागणारा निधी वितरित केला जातो. त्यानुसार सन २००६-२००७ मध्ये शासनाकडून रु १४.१६ कोटी निधी जिल्ह्याला प्राप्त झाला. तसेच याच कालावधीमध्ये जुन्या रोजगार हमी योजनाचे रूपांतर होऊन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र या योजनेची सुरुवात झाली. त्यामुळे रु.१० कोटी ८९ लक्ष निधी समर्पित करण्यात आला. तथापि,, यंत्रणांनी त्यांच्या मागणीनुसार खर्च केलेला आहे.

उपरोक्त खुलाश्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी दिनांक २८ ऑगस्ट २०१२ रोजीच्या बैठकीत समितीस अशी माहिती दिली की, सन २००६-२००७ मध्ये रोहयोसाठी ७ कोटी ७९ लाख रुपये आले होते. जिल्ह्यात एमआरईजीएस योजनेची कामे सुरू असल्यामुळे ती रक्कम खर्च झाली नाही. शासनाकडे ४.१८ कोटी रुपयांची मागणी केली होती त्यापैकी ३.२५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. रोहयोच्या कामासाठी तिमाही निधीची मागणी शासनाकडे केली जाते. मागील तिमाही किती खर्च झाला आहे ते पाहून शासनाकडे ४.१८ कोटी रुपयांची जिल्हाधिकाऱ्यांनी मागणी केली. तथापि, शासनाकडून ९.९८ कोटी रुपये वितरित झाले आहेत. यावर समितीने असे निदर्शनास आणले की, सन २००६-२००७ मध्ये ४.१४ कोटी रुपयांची शासनाकडे मागणी करण्यात आली होती. प्रत्यक्षात मात्र मागील ३ वर्षांतील निधीचा विचार करून मागणीपेक्षा ९.९८ कोटी रुपये जास्त वितरित केले असल्याचे दिसून येत आहे. शासनाकडून एकूण १४.१६ कोटी रुपये प्राप्त झाले होते. त्यातील १० कोटी रुपये समर्पित केले आहेत.

शासनाकडून जास्तीचे पैसे का वितरित करण्यात आले? तसेच जिल्हाधिकाऱ्याकडून रोहयोसाठी जेवढी पैशाची मागणी केली होती त्यापेक्षा जास्त पैसे मिळाले होते. उर्वरित पैसे शासनाकडे समर्पित केले असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केल्याने त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. याबाबत विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, संबंधित यंत्रणानी मागणी केली नसली तरी मागील ३ महिन्यांत जो निधी वितरित केला जातो. त्या प्रमाणामध्ये त्यांना रक्कम वितरित केली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, यंत्रणेने ४.२५ कोटी रुपयांची मागणी केली असताना त्यांना १० कोटी रुपये शासनाकडून वितरित केले आहे असा एकूण १४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आणि त्यातील १० कोटी रुपये समर्पित केले असल्याने या संबंधी तत्कालीन

जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य तो खुलासा केला नव्हता म्हणुन पुढील साक्षीच्या वेळी योग्य तो खुलासा करावा अशी समितीने सूचना दिल्या. १०.९४ कोटी रुपये आले व ते खर्च झाले नाही. ज्या यंत्रणेने रकमेची मागणी केली होती ती रक्कम खर्च न होता समर्पित केली ही अतिशय गंभीर बाब आहे. सदरहू प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी १ महिन्याचा कालावधी देण्यात यावा अशी जिल्हाधिकारी यांनी समितीला विनंती केली.

प्रश्नावलीच्या माध्यमातून समितीने पुढे विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, नांदेड यांनी रुपये ३२.२० लाख एवढी रक्कम पुढील वर्षी खर्च केली आहे. याबाबतीत खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात आला आहे.

सन २००८-२००९ साठी रु.३२.०१ लक्ष निधी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, नांदेड यांना दिनांक ३१ मार्च २००९ रोजी वितरित करण्यात आला होता. त्यांनी तो निधी सन २००९-२०१० मध्ये खर्च केला आहे. सदरहू खर्च पुढील आर्थिक वर्षात करण्यासाठी त्यांनी परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता व विभागीय लेखापाल यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. विभागीय लेखापाल यांनी त्यांचे म्हणणे सादर केले. परंतु ते असमाधानकारक असल्याने अमान्य करून त्यांचे विरूद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

उपरोक्त खुलाशाच्या अनुषंगाने समितीने विचारले की, यामध्ये मागणी केल्यानुसार दिनांक ३१ मार्च २००९ रोजी निधी वितरित करण्यात आला आहे. परंतु विभागाला दिनांक १ एप्रिल २००९ रोजी निधी प्राप्त झाल्यामुळे सदरचा खर्च सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात खर्च झाला आहे. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. यावर जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रस्तुत प्रकरणाचा आढावा घेण्यात आला होता. त्यांनी दिनांक ३१ मार्च रोजी निधी प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. सदर निधी हा पुढील आर्थिक वर्षात खर्च केल्याने या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांच्याकडून खुलासा मागविला होता.

दिनांक ३१ मार्च २००९ अखेरीस शिल्लक राहणारा निधी समर्पित करावा लागतो. दिनांक १ एप्रिल २००९ रोजी निधी खर्च करावयाचा असेल तर शासनाची परवानगी घ्यावी लागते. दिनांक ३१ मार्च २००९ रोजी शासनाकडे निधी समर्पित झाला नसेल तर ते चुकीचे आहे व खर्च केला असेल तर ते आणखी बेकायदेशीर आहे. निधी खर्च करण्यासाठी मान्यता मिळवण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला होता काय ? असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, संबंधित अधिकाऱ्यांनी वित्त विभागाची मान्यता घेतली नसल्याने त्यांच्याकडून खुलासा मागविला होता. समितीने विचारले की, त्यावर्षी खर्च केलेला निधी हा त्याच कामावर खर्च केला आहे काय? त्यावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, कुशल कामावर खर्च केला आहे. दिनांक ३१ मार्च २००९ रोजी निधी बँकेत न ठेवता तो दिनांक १ एप्रिल, २००९ रोजी ठेवण्यात आला होता . शासनाची परवानगी घेऊन खर्च करणे अभिप्रेत होते. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना माहितीस्तव पत्र देण्यात आले होते. त्यानंतरच निधी खर्च करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराने समितीचे समाधान न झाल्याने यामध्ये आर्थिक अनियमितता झाली असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले असल्याने याबाबत त्यावेळची काय परिस्थिती होती? याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी असे समितीने स्पष्ट केले. त्यावेळी जिल्हाधिऱ्यांनी त्यास मान्यता दर्शविली.

रोजगार हमी योजनेच्या कामाचे नियोजन करून यंत्रणा निधीची मागणी करीत नसल्यामुळे अशा यंत्रणांवर कारवाई करण्यात आली आहे काय? नसल्यास त्याची कारणे काय आहेत? तसेच याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने आढावा घेतला आहे काय? असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात कामाचे वार्षिक नियोजन होते त्या वर्षात जलसंधारणाची ५६ टक्के कामे केली आहे. पाटबंधारेची १० टक्के कामे देण्यात आली होती. त्यापैकी ४ टक्के कामे झाली. वनीकरणाची कामे ५ टक्के होती. त्यापैकी ९ टक्के कामे झाली आहेत. रस्त्यांची ३० टक्के कामे होती. त्यापैकी २८ टक्के कामे झाली आहेत. त्यामध्ये रस्ते व पाटबंधारे या दोन्ही विभागानी त्यांच्या टक्केवारीनुसार कामे केली आहेत. त्यानंतर सन २००६-२००७ मध्ये एमआरईजीएस सुरू झाली.

समितीने पुढे असे स्पष्ट केले की, संबंधित यंत्रणा काम करतात किंवा कसे याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची आहे, याबाबत त्यांनी आढावा घेण्याची, यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश देण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, समितीने दिलेल्या निदेशाप्रमाणे एक महिन्यात आढावा घेऊन पुढील कारवाई केली जाईल तसेच यासंदर्भात समितीला अनुपालन अहवाल दिला जाईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

**नांदेड जिल्ह्यातील विविध यंत्रणांनी कामाचे सुयोग्यरित्या नियोजन न केल्याने शासनाकडून रक्कम मंजूर झालेली असतानाही ती खर्च करण्यात आली नाही. यंत्रणांनी जिल्हाधिकाऱ्यामार्फत शासनाकडे निधीची मागणी केलेली नसतानाही शासनाने मागील तिमाही खर्च विचारात घेऊन निधी वितरित केला सदर निधी परिपूर्ण खर्च न करता तो शासनास समर्पित केला असल्याने जिल्ह्यातील या योजनेशी संबंधित अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता दिसून येते. तसेच आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच दिनांक ३१ मार्च रोजी निधी वितरित करण्यात आल्याने तो पुढील वर्षी दिनांक १ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षात खर्च करावयाचा झाल्यास**

**त्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करून शासनाची परवानगी मिळविणे बंधनकारक आहे अन्यथा निधी खर्च करता येत नाही असे असतानाही कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, नांदेड यांना निधी खर्च करण्याची परवानगी घेतली नसल्यामुळे यासंबंधात दोषी असलेल्या विरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**निधीची मागणी आणि पुरवठ्याबाबत एकमेकांशी पूर्ण समन्वय ठेवून निधीची मागणी करावी, जेणेकरून विविध यंत्रणांच्या आवश्यकतेनुसार योग्य प्रमाणात निधी उपलब्ध होण्यास मदत होईल. या संदर्भात भविष्यात प्राप्त होणारा निधी योग्यरितीने खर्च करण्यासाठी योग्य ते नियोजन करण्यासंदर्भात यंत्रणांच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सक्त सूचना द्याव्यात व यासंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशीही समिती शिफारस करीत आहे.**

### (३) मजुरांच्या सोयी सवलतींवर करण्यात आलेला खर्च :

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमधील "मजुरांच्या सोई सवलतींवरील खर्च" या संदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००६-२००७ मध्ये मजुरांच्या सोई सवलतीवर फक्त १.२४ टक्के रक्कम खर्च झालेली आहे. मजुरांच्या सोई सवलतीवर ३ टक्के रक्कम खर्च व्हावयास पाहिजे. मजुरांच्या सोई सवलतीवर कमी रक्कम खर्च होण्याची कारणे काय आहे? मजुरांच्या सोई सवलतीवर खर्च झालेल्या रकमेची टक्केवारी १.२४ ऐवजी १.२१ नमूद केली आहे. तसेच खर्च करण्यात आलेली एकूण रक्कम ३.२५ लाख रुपये नमूद केली आहे, तथापि, दिनांक २८ ऑगस्ट २०१२ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी बैठकीमध्ये समितीला पुढीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात आला.

(१) सन २००६-२००७मधील एकूण खर्च — रु.३२५.०१७ लक्ष

(२) सन २००६-२००७ मधील अकुशल खर्च — रु.१०३.३९६ लक्ष

(३) सन २००६-२००७ मधील कुशल खर्च — रु.२२१.६७५ लक्ष

(४) मजुरांच्या सोयी-सुविधांवर झालेला खर्च — रु.२.७४१ लक्ष

(५) सोयी-सुविधांवर झालेल्या खर्चाची अकुशल खर्चाशी टक्केवारी – २.६५ टक्के

शासन निर्णय क्रमांक रोहयो -२००३/प्र.३८/रोहयो-६, दिनांक २६ ऑगस्ट २००३ नुसार मजुरांच्या सुविधेसाठी अकुशल कामावर खर्चाच्या ३ टक्केपर्यंत खर्च करण्यात यावा असा शासन निर्णय आहे. सन २००८-२००९ मध्ये एकूण रुपये २०.६० लक्ष खर्च केला असून हा सर्व निधी कुशल कामावर केला आहे. उपरोक्त खर्च हा जुन्या रोहयो कुशल कामावर झालेला असल्यामुळे मजुरांच्या सोयी-सवलतीवर खर्च निरंक आहे.

सन २००६-२००७ व २००७-२००८ या दोन वर्षात मजुरांच्या सोयी-सवलतींवर १ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात आला आहे. इतका कमी खर्च मजुरांच्या सोयी-सवलतीवर का करण्यात आला आहे. व त्याची कारणे काय आहेत? असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, यासंदर्भात संबंधित यंत्रणे समवेत २ वेळा त्यांच्या स्तरावर बैठका घेण्यात आल्या आहेत. मागील ५ वर्षात कुशल बाबींवर जास्त खर्च झाला आहे. जुनी देयके संबंधित कंत्राटदारांना देण्यासाठी खर्च झाला आहे. समितीने पुढे विचारणा केली की, कुशल कामे करण्यासाठी मजुरांना मजुरी दिली जाते. एखाद्या बंधाऱ्याला मातीच्या पिचिंगसाठी मजुरांची गरज असते. त्या कामासाठी दगड वाहून नेण्यासाठी मजुरांची आवश्यकता असते. त्यामुळे मजुरांवर खर्च केलेला आहे काय? यावर जिल्हाधिकारी यांनी समितीला माहिती दिली की, वर्षनिहाय सन २००५-२००६ मध्ये मजुरांच्या सोयी-सवलतीवर १३ लाख रुपयांचा खर्च केलेला आहे. त्याची ४.७८ इतकी टक्केवारी आहे. सन २००६-२००७ मध्ये मजुरांच्या सोयी-सवलतीवर ३ लाख ९२ हजार रुपयांचा खर्च केला आहे. त्याची १.२१ इतकी टक्केवारी आहे. रोजगार हमी योजनेमधून सन २००८-२००९ मध्ये मजुरांच्या सोयी-सवलतींवर काहीही खर्च केला नाही.

### अभिप्राय व शिफारशी :

**मजुरांच्या सोयी-सवलतीवरील खर्चाच्या संदर्भात समितीच्या असे निर्दशनास आले आहे की, सन २००६-०७ व सन २००७-०८ या दोन वर्षांच्या कालावधीत काही यंत्रणानी एकूण खर्चाच्या टक्केवारीपेक्षा कमी रक्कम मजुरांच्या सोयी-सवलतीवर खर्च केली आहे.तर काही ठिकाणी जास्त खर्च करण्यात आला आहे. विविध यंत्रणांनी उपस्थित मजुरांना सोयी-सवलती पुरविण्यासाठी शासन निर्णयानुसार एकूण खर्चाच्या ३ टक्के एवढी रक्कम खर्च करणे आवश्यक असताना यंत्रणांनी मजुरांच्या सोयी-सवलतीवर ३ टक्केपेक्षा कमी खर्च केला आहे. ही अनियमितता असून समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की अनेक जिल्हयामध्ये याच प्रकारची अनियमितता आढळून येते. त्यामुळे शासन निर्णयाप्रमाणे मजुरांना परिपूर्ण सुविधा पुरविण्यात येत नाहीत ही बाब गंभीर असून याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. सबब, मजुरांना शासन निर्णयानुसार विहीत मर्यादेत सोयी-सवलती उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणांनी योग्य ती काळजी घ्यावी अशी सूचना करण्यात येत असून या संदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांत समितीला सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**(४) मजुरीचे वाटप :**

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमधील "मजूरीचे वाटप" या संदर्भात समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग या यंत्रणेच्या ७ हजेरीपटास ३ आठवड्यापेक्षा जास्त विलंब होण्याची कारणे काय आहे? यावर कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) वि.नांदेड यांनी सांगितले की, प्रकल्प अधिकाऱ्यांकडे जाऊन धनादेश घेऊन यावा लागत होता. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रकल्प अधिकारी यांच्याकडे निधी जात होता. त्यानंतर आम्हाला प्रकल्प अधिकाऱ्याकडून धनादेश मिळत होता. त्यामुळे विलंब झाला आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम यांना मजुरी वाटपास ४ आठवडयापेक्षा जास्त वेळ लागलेला असल्याने त्याची कारणे स्पष्ट करावी यावर कार्यकारी अभियंता, यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेच्या अंतर्गत पत मर्यादेच्या जुन्या कार्यपद्धतीमुळे विलंब झाला. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी २१ हजेरीपटाच्या मजुरी वाटपास ४ आठवड्याहून अधिक वेळ लावलेला असून, त्याची कारणे काय आहे? तसेच मजुर कामावर येऊ नये अशा प्रकारची तरतूद करून ठेवली होती काय? अशी विचारणा समितीने केली असता, कार्यकारी अभियंता, सा.बा.नांदेड यांनी सांगितले की, यामध्ये नंबर ऑफ वर्क जास्त होते. प्रत्येक टप्प्यावर कामाची संख्या १९ होती.

समितीने विचारणा केली की, १९ कामे कोणती आणि कोणत्या भागातील आहेत तसेच ज्युनिअर इंजिनिअरने किती कामे करावीत यासंदर्भात मानके ठरलेली आहेत काय ? यावर अधीक्षक अभियंता, सा.बा, नांदेड यांनी माहिती दिली की, रोजगार हमी योजनेत एका ज्युनिअर इंजिनिअरकडे दोन कामे असावीत असे स्पष्ट संकेत आहेत तसेच सन्माननीय सदस्यांना या संदर्भात योग्य ती माहिती विभागीय कार्यालयाकडून प्राप्त केल्यानंतर दिली जाईल.

समितीने विचारणा केली की, उप वनसंरक्षक, नांदेड या यंत्रणेकडून मजुरी वाटपासाठी ३ हजेरीपटास ३ आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झाला आहे. मजुरी वाटपास विलंब होण्याची कारणे काय आहेत तसेच सीसीटीचे आकारमान काय असते ? उप वनसंरक्षक यांनी सांगितले की, यामध्ये रोपवन देखभालीची कामे आहेत. वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे हजेरीपट जाण्यास उशीर झाला असल्यामुळे मजुरी वाटपास विलंब झालेला आहे. २ फूट रुंद आणि १ फूट खोल असे सीसीटीचे आकारमान आहे.

खेड्यामध्ये मजूर शेतकऱ्यांच्या शेतामध्ये कामासाठी जातात. त्या मजुरांना बाजाराच्या दिवशी पगार मिळतो. शेतकऱ्याला बाजाराच्या दिवशी मजुरांना मजुरी द्यावी लागते. रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना एक-दोन महिने मजुरी मिळत नाही. मजुरी वाटपास विलंब होत असल्यामुळे मजुरांचे रोजगार हमी योजनेच्या कामावर येण्याचे प्रमाण कमी झाले आहे. रोजगार हमी योजनेच्या कामावर येणारे लोक गरीब असतात. रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना वेळेवर मजुरी मिळत नाही आणि ही परिस्थिती संपूर्ण राज्यात आहे तसेच शासनाने रोजगार हमी योजनेतून मजुरी वाटप करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला पाहिजे असे समितीने स्पष्ट केले असता जिल्हाधिकारी, नांदेड यांनी समितीला सांगितले की, नांदेड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना ३-४ आठवड्यांमध्ये मजुरी दिली जाते. केंद्र शासनाकडे २५ कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु, फक्त ८ कोटी रुपये मिळाले आहेत. त्यामुळे मजुरी वाटपास विलंब झालेला आहे. आंध्रप्रदेश सरकारकडून सर्व जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांचे एकत्रित अंदाजपत्रक तयार करून केंद्र सरकारकडे निधीची मागणी केली जाते. त्यामुळे त्यांना केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर निधी मिळतो. राज्यातील प्रत्येक जिल्ह्याकडून केंद्र शासनाकडे निधीची मागणी केली जाते. त्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची जेवढी कामे झालेली आहेत त्याप्रमाणात निधी मिळतो.

कर्मचाऱ्यांच्या पगारातून व्यवसाय कराच्या माध्यमातून ठराविक रक्कम कपात केली जाते. व्यवसाय कराच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी २-३ हजार कोटी रुपये जमा होतात. मध्यंतरी राज्य शासनाने कायदा केला आहे की, हा निधी खर्च होत नसल्यामुळे एकत्रित निधीत जमा करावा. केंद्र शासनाकडून निधी येण्यास विलंब झाला तर शासनाने मजुरी वाटप करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला पाहिजे असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सांगितले की, त्याना १० कोटी रुपये तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे. १०० दिवसांची पुढील मजुरी राज्य शासनाला उपलब्ध करून द्यावी लागते. उपायुक्त, रोजगार हमी योजना, औरंगाबाद यांनी माहिती दिली की, निधीच्या मागणीची प्रक्रिया २ ऑक्टोबर रोजी सुरू होते. २ ऑक्टोबर रोजी ग्रामसभा होते. कोणते काम घ्यावयाचे आहे हे ठरवून त्यांनी आमच्याकडे कामाची यादी पाठवावयाची असते.

समितीने विचारणा केली की, संपूर्ण वर्षात किती निधी खर्च होणार आहे याचे अंदाज २ ऑक्टोबर रोजी तयार केले पाहिजे. तथापि, आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवली किंवा एक महिना पाऊस पडला नाही तर आपण काय करणार? यासंदर्भात मुख्य सचिवांनी नियमित आढावा घ्यावा त्यामुळे यामध्ये फरक पडेल तसेच रोजगार हमी योजनेसाठी राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध करून दिला जातो. शंभर दिवसाच्या वरील खर्च राज्य शासनाला करावयाचा आहे. म्हणून अग्रीम उपलब्ध करून दिला पाहिजे. त्याचे नंतर समायोजन करावे.

यावर उपायुक्त, रोजगार हमी योजना, औरंगाबाद यांनी सांगितले की, एप्रिल, मे आणि जून महिन्यामध्ये रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांची संख्या वाढलेली असते. तसेच रोजगार हमी योजनेसाठी निधीची कमतरता नाही.

जिल्हा बैठकीत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, रोहयोच्या कामावरील मजुरांना पगार वेळेवर मिळण्यासाठी हजेरी पट तपासणी मधील टप्पे कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली. समितीने जिल्ह्यातील रोहयोच्या कामांना भेटी दिल्या त्यावेळी मजुरी वाटपासाठी १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागल्याचे व काही कामांच्या ठिकाणी एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागल्याचे निदर्शनास आले. त्याबाबत समितीने अशी सूचना केली होती की, हजेरी पट तपासणीमधील काही टप्पे कमी केले तर मजुरांना वेळेवर पगार मिळू शकेल. रोहयोच्या कामावरील मजुरांना दर आठवडयाला पगार मिळणे अपेक्षित आहे. परंतु, बऱ्याच ठिकाणी दीड महिन्यापर्यन्त पगार देऊ शकत नाही. याकरिता हजेरी पट तपासणीमधील टप्पे कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे?तसेच जिल्हा स्तरावर संदेशवाहक यांची नियुक्ती केली, त्यांचे पेमेंट कोण करीत आहे?

जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, रोहयोचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे एम.बी. रेकॉर्ड करण्यासाठी सर्वात जास्त कालावधी लागतो. हे काम करण्यासाठी आज दहा ग्रामपंचायतीच्या मागे एक ज्युनिअर इंजिनिअर असतो. आमच्याकडे जवळपास १५०० च्या वर मस्टर असतात. त्यांचे एम.बी. रेकॉर्डींग करण्यासाठी प्रत्येक ब्लॉकला एक ज्युनिअर इंजिनिअर देऊन त्याच्याकडून तातडीने तपासणी करून एम.बी. पुटअप करीत असतो. अशाप्रकारे एका वेळी चार ते पाच गावांचे एम.बी. रेकॉर्डींग पूर्ण केल्यानंतर ते मंजुरीसाठी पाठविण्यात येते. या कामांचे फीडबॅक घेऊन ते शासनास सादर करण्यात येते, त्यानंतर शासन त्याबाबत निर्णय घेते. तसेच संदेशवाहक कॉट्रॅक्ट बेसिसवर नेमले आहेत, त्यांचे पेमेंट ६ टक्के प्रशासकीय खर्चामधून करण्यात येते.

हजेरी पटाच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा केल्यानंतर आता किती दिवसात मजुरांना पेमेंट मिळते? या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सद्या आहे तशीच परिस्थिती आहे, त्यामध्ये सुधारणा झालेली नाही. विभागीय सचिवानी सांगितले की, हे काम करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. त्यामध्ये पेमेंट करण्यास विलंब लागण्याची कारणे काय, पेमेंट करण्याच्या कार्यपद्धतीमध्ये कोणकोणते विषय वाढले आहेत, मजुरांना वेळेवर पेमेंट करण्यात आले पाहिजे व त्यामध्ये पारदर्शकता आणली पाहिजे यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे. परंतु, या कामासाठी स्वतंत्र मनुष्यबळ नाही. सद्या जे इंजिनिअर्स आहेत त्यांचा वापर करण्यात येत आहे. यावर्षी जवळपास पाच पटीने काम वाढले असल्यामुळे चार ते पाच उपाय सुचविले आहेत. पहिल्या प्रथम तालुका पातळीवर १ एप्रिलपासून मस्टर ट्रेकर सिस्टीम सुरू केली आहे. यापूर्वी तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांच्या पातळीवर मस्टर तयार होऊन चार ते पाच महिन्यानंतर ते पाठविण्यात यायचे. आता प्रत्येक मस्टर क्रमांकनिहाय पाठविण्यात यावेत अशाप्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुसरे असे की, हजेरी पट तयार करण्यासाठी कॉट्रॅक्ट बेसिसवर कर्मचारी नेमण्यात यावा. विभागाच्या नियमित कर्मचाऱ्यांनी फक्त मेजरमेंट घेण्याचे काम करावे. तिसरे असे की, पोस्ट ऑफिसची कार्यपद्धती फार जुन्या स्वरूपाची आहे त्याऐवजी बाजारपेठेच्या ठिकाणी बँकेची व्यवस्था करण्यात यावी. ब्रम्हपुरीसारख्या तालुक्याच्या ठिकाणी अशाप्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याठिकाणी अकाऊंटला १२ ते १५ लाख रुपये जमा होत आहेत. परंतु, ही पद्धत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सुरू केलेली नाही ती करण्याचा प्रयत्न सुरू आहे. चौथा मुद्दा असा की, एम.आय.एस.चा निधी वेळेवर मिळाला पाहिजे त्यासाठी नवीन कार्यप्रणाली अंमलात आणीत आहोत. अशाप्रकारचे चार ते पाच उपक्रम राबवीत आहोत.

समितीने विचारणा केली की, या ठिकाणी पोस्ट ऑफिसच्या कार्यपद्धतीबाबत सांगितले आणि बँकेचे व्यवहार लक्षात घेता या कायद्यामध्ये अधिक पारदर्शकता आणली आहे. परंतु, महिना ते दीड महिन्यापर्यन्त मजुरांना मजुरी देऊ शकत नाही. खानापूर, आटपाडी, कवठेमहाकाळसारख्या दुष्काळी भागात गाळ काढण्याची कामे सुरू केली. त्या ठिकाणी रोहयोच्या कामावर काम करणाऱ्या मजुरांना दीड महिन्यापर्यंत पगार देऊ शकले नाही त्या ठिकाणाचे लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी जबाबदारी घेऊन उचल म्हणून त्यांना काही रक्कम देतात. आणि मजुरांना पगार मिळाल्यानंतर त्यांच्या पगाराच्या रकमेमधून सदर रक्कम कापून घेतात अशी वस्तुस्थिती आहे.

विभागीय सचिवानी पुढे असे सांगितले की, नरेगा योजना सुरू झाल्यानंतर पहिल्या वर्षी काही जिल्ह्यांमध्ये मजुरीच्या वाटपात सुसूत्रता नव्हती. केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या संपूर्ण निधीचा विनियोग पहिल्या वर्षी आपल्या राज्याकडून झाला नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, दुसऱ्या वर्षी मोठ्या प्रमाणावर या योजनेतून कामे हाती घेण्यात आली. मजुरीच्या वाटपास एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागू नये, किंबहुना, तीन ते चार आठवड्याच्या आत मजुरीचे वाटप व्हावे, असा विभागाचा प्रयत्न आहे. यासाठी विभागाने फार मेहनत घेतली असून अनेक उपाययोजना केल्या आहेत. मजुरीच्या वाटपासाठी साधारणपणे २० दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागणार नाही असा प्रयत्न आहे. याचाच एक भाग म्हणून अन्य उपाययोजनांसह 'ई-मस्टर' ची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या समितीचे काही सदस्य हे दुष्काळी भागातील आहेत. तसेच अन्य काही सदस्य ग्रामीण भागात काम करणारे आहेत. त्यामुळे रोजगार हमी योजना, मजूर, मजुरीचे वाटप यांच्याशी त्यांचा दैनंदिन संबंध येतो. सर्वांना आलेला अनुभव चांगला नाही. जिल्हा नियोजन व विकास समितीमध्ये

देखील हा प्रश्न त्यांनी वारंवार उपस्थित केलेला आहे. गेल्या महिन्यापर्यंत मजुरीच्या वाटपाबाबत परिस्थितीत काही बदल झाल्याचे त्याना निदर्शनास आलेले नाही. मजुरीच्या वाटपासाठी आजही दीड महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागतो, ही वस्तुस्थिती आहे. नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत मजुरीचे वाटप व्हावे, ही प्रशासकीय बाब आहे व त्यासाठी करावयाच्या उपाययोजना, हा विभाग स्तरावरील प्रश्न आहे. परंतु, मुद्दाम हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, समिती प्रमुख किंवा समिती सदस्यांच्या जिल्ह्यातील अनुभव चांगला नसेल तर अन्य जिल्ह्याची परिस्थिती काय असेल, याचा अंदाज बांधणे कठीण नाही. त्यामुळे या विषयाकडे विभागाने अतिशय गांभीर्याने बघितले पाहिजे, असे समितीने आपले मत मांडले.

विभागाने लिखित खुलासाही केला आहे. संदेश वाहकांची नेमणूक करण्यात आली आहे, मजुरी अदायगीचा कालावधी १५ ते २० दिवसांनी कमी केला आहे, या उपाययोजनांचा उल्लेख लेखी खुलाशात आहे. परंतु, कागदपत्रातून दिसणारी परिस्थिती आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये मोठी तफावत आहे. त्यामुळे नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

तसेच प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मस्टर ठेवण्याचा विभागाचा किंवा नांदेड जिल्ह्याचा निर्णय अतिशय योग्य असून त्यामुळे मजुरीच्या वाटपास गती येईल. परंतु, प्रश्न असा आहे की, अभियंत्यांची संख्या वाढविल्यानंतरही अनेक कामांचे मोजमाप वेळेवर केले जात नाही व एम.बी.रेकॉर्ड वरिष्ठ पातळीवर पाठविले जात नाहीत. एम.बी.रेकॉर्ड वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे पुढील कार्यवाही खोळंबते व मजुरीच्या वाटपास विलंब लागतो, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मोजमाप करून एम.बी.रेकॉर्ड वरिष्ठ स्तरावर पाठविण्यासाठी कालावधी निश्चित केला पाहिजे. त्याबाबतीत अभियंत्यांवर निर्बंध घातले पाहिजेत. तसेच, संबंधीत अधिकाऱ्यांनी पुढील कार्यवाही किती कालावधीत पूर्ण केली पाहिजे, याचेही बंधन घालून दिले पाहिजे. अशा प्रकारची लिखित कार्यपद्धती व उत्तरदायित्व निश्चित केले तर संबंधीत अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करता येऊ शकेल. आज जिल्ह्याजिल्ह्यात अशी परिस्थिती आहे की, वेळेवर मजुरी मिळत नसल्यामुळे गरज असतानाही मजूर कामावर येत नाहीत. मजुरीच्या वाटपाचा कालावधी कमी करण्याचा प्रयत्न विभागाकडून करण्यात येत आहे. परंतु, मजुराला त्याच दिवशी संध्याकाळी मजुरी मिळाली पाहिजे. आता सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी लागणारा कालावधी, तांत्रिक बाबी यांचा विचार करून किमान दोन आठवड्यात तरी मजुरीचे वाटप झाले पाहिजे, अशी समितीची किमान अपेक्षा आहे.अकोला जिल्ह्यातील. एका कामावर १७५ मजुरांची उपस्थिती होती. परंतु, वेळेवर मजुरीचे वाटप न झाल्यामुळे मजूर उपस्थिती ५० वर आली व त्यानंतर ती २५ वर आली. शेतीवर काम करणाऱ्या मजुरांना प्रति दिवस २०० रुपये मजुरी मिळते व त्या तुलनेत रोजगार हमी योजनेच्या कामांवर काम करणाऱ्या मजुरांना अतिशय कमी मजुरी मिळते. शेतीवरील मजुरांना त्याच दिवशी रोख स्वरूपात मजुरी मिळते. तर रोजगार हमी योजनेवरील मजुरांना दीड-दोन महिन्यांनंतर मजुरी मिळते. अशा सर्व बाबतीत फार मोठा फरक आहे व विभागाने या सर्व बाबींचा अभ्यास करून उपाययोजना केल्या पाहिजेत.

जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, गेल्या वर्षी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर नरेगामधील कामे घेण्यात आली होती. या योजनेसाठी आमची यंत्रणा कमी पडली, हे मान्य करतो. कामे पूर्ण केल्यानंतर सविस्तर माहिती केंद्र शासनाला पाठवावी लागते. त्यानंतरच केंद्र सरकारकडून निधी पाठविला जातो. या तांत्रिक बाबी देखील पूर्ण करण्यास विलंब झाला, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, आता कनिष्ठ अभियंता किंवा अन्य तांत्रिक अधिकारी यांनी अमूक एवढ्या दिवसात काम पूर्ण केले पाहिजे, अशी जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. मस्टरबाबतही पाठ पुरावा करण्यात येत आहे.

समितीने पुढे असेही स्पष्ट केले की, समितीचा दौरा होऊन १ वर्षांचा कालावधी झाला आहे. तथापि, आजही परिस्थितीत बदल झालेला नाही, ही बाब मुद्दाम सचिवांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. या संदर्भात राज्यस्तरावर करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती सचिवांनी यापूर्वीच दिलेली आहे. परंतु, नांदेड जिल्ह्याच्या बाबतीत परिस्थितीत बदल झालेला नाही, महाराष्ट्राची रोजगार हमी योजना देशाला मार्गदर्शक ठरली आहे. समितीने एक वर्षापूर्वी नांदेड जिल्ह्याचा दौरा केला होता. समितीने निदर्शनास आणून दिलेल्या बाबींसंदर्भात सुधारणा झाली असावी, अशी समितीची अपेक्षा होती. परंतु, काहीही सुधारणा झालेली नाही. राज्य पातळीवर करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत सचिवांनी माहिती दिली. त्याबद्दल समितीला काही म्हणावयाचे नाही. कारण, त्या भविष्यकालीन उपाययोजना आहेत. परंतु, समितीने दौरा केल्यानंतर व त्रुटी निदर्शनास आणून देऊन सुधारणा करण्याबाबत सूचना देऊन सुद्धा जर काही बदल होणार नसतील तर समितीच्या दौऱ्याला काय अर्थ राहणार आहे ? समितीने केलेल्या सूचनांची अंमलबजावणी स्थानिक यंत्रणांकडून, जिल्हा प्रशासनाकडून झालीच पाहिजे. तरी मजुरीच्या वाटपाचा कालावधी कमी करण्याबाबत किती दिवसात बदल घडवून येईल.

जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, मजुरीच्या संदर्भात विविध टप्पे आहेत. मस्टर तयार झाल्यानंतर कनिष्ठ अभियंता यांच्याकडून कामाचे मोजमाप करण्यात येते. ग्रामसेवकांमार्फत मस्टर व एम.बी.रेकॉर्ड गटविकास अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येते. अेपीओ यांच्याकडून त्याची तपासणी होते व अकाऊंटस् ऑफिसर यांच्याकडे दिले जाते. त्यांची व गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी झाल्यानंतर निधीचे वाटप केले जाते. गटविकास अधिकारी कार्यालयातील काही टप्पे कमी केले तर कार्यवाही लवकर होऊ शकेल. यादृष्टीने तपासणी करण्यात येत आहे.

यावर समितीने विचारणा केली की, रोजगार हमी योजनेसाठी शासनाकडून आवश्यक तेवढा निधी जिल्हास्तरावर प्राप्त होतो का आणि निधीअभावी मजुरीचे वाटप करण्यास विलंब झाला, आहे काय एका वर्षात जिल्हा प्रशासनाने कोणकोणत्या सुधारणा केल्या, मजुरांना किती कालावधीत मजुरी दिली जाते, गेल्या वर्षी या कामांवर किती खर्च करण्यात आला? समितीच्या जिल्हा बैठकीनंतर वर्षभरात पूर्ण केलेल्या कामांची मजुरी मजुरांना देण्यात आलेली नसून अजूनही काही प्रमाणात मजुरी मिळालेली नाही. त्यामुळे एक वर्षापूर्वी समितीने काढलेले निष्कर्ष आणि मजुरांना विलंबाने देण्यात आलेल्या मजुरीबाबत गेल्या एक वर्षात जिल्हा प्रशासनाने कोणती कार्यवाही केली व या संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे ?

जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, काही वेळा शासनाकडून निधी उशिरा प्राप्त होतो. गेल्या वर्षी १५६ कोटी रुपये खर्च झाला आहे.

विभागीय सचिवांनी माहिती दिली की, गेल्या वर्षी नांदेड जिल्ह्याने रोजगार हमी योजनेवर सर्वात जास्त खर्च केला आहे. राज्यातील कोणत्याही जिल्ह्याने १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च केलेला नाही. त्यापूर्वीच्या वर्षी महाराष्ट्रात नरेगावर काहीही खर्च होऊ शकला नव्हता. सन २०१०-२०११ मध्ये ३४५ कोटी रुपये खर्च आणि १८० लक्ष मनुष्यदिवस निर्माण करण्याचे काम झाले आहे. एका वर्षात ४ पट मनुष्यबळ निर्माण केले गेले आहे. पुणे आयुक्तालयाने मागील वर्षापेक्षा १४ पट जास्त मनुष्यबळ निर्माण केले आहे आणि खर्च देखील वाढला आहे. ज्या वर्षी नरेगा योजना सुरू झाली त्यावेळी या आयुक्तालयाचा खर्च शून्य होता. त्यानंतर सन २०११-२०१२ मध्ये १४ टक्क्याने वाढ झाली आहे. एक गोष्ट मान्य करण्यात येत आहे की, ही योजना राबविण्यासाठी या विभागाकडे स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध नाही. तरी देखील नांदेड जिल्ह्याने १५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. या जिल्ह्याने नवीन कामे सुरू केली व ती पूर्ण केली आहेत. परंतु, मेजरमेंट व अन्य तांत्रिक बाबी पूर्ण करण्यासाठी या जिल्ह्यांकडे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नव्हते. त्यानंतर विभागाने या जिल्ह्याला अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला होता. मेजरमेंट करून मागील १ वर्षाची देयके अदा करावी, अशा सूचना दिलेल्या आहेत. त्या वर्षी कामे पूर्ण केलेली असली तरी एमआयएसमध्ये आवश्यक ती माहिती न भरल्यामुळे अडचण निर्माण झाली होती. आता एमआयएसमध्ये माहिती भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

उपायुक्त, रोहयो यांनी अशी अधिक माहिती दिली की, सन २०११-२०१२ मध्ये १०५ कोटी ०७ लक्ष बजेट मंजूर केले होते. साधारणपणे ७८,४०० कुटुंबांना रोजगार द्यायचा होता. नांदेड जिल्ह्यात ७०,९५४ कुटुंबांना रोजगार दिलेला आहे. केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे प्रति दिवस १२७ रुपये मजुरीस मान्यता आहे राज्यात १९० रुपये मजुरी देण्यात येते. केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवितांना रुपये १२७ प्रमाणे कॅलक्युलेशन केले जाते. रुपये १९० आणि १२७ मधील फरक राज्य शासनाकडून देण्यात येतो. केंद्र शासनाकडून १०० दिवस मजुरीची हमी देण्यात आलेली आहे. त्यावरील मजुरीचे पैसे राज्य शासनाकडून देण्यात येतात. अशा प्रकारे ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्याचप्रमाणे एमआयएसवर ६० टक्क्यांच्या वर खर्च झाल्याचे दिसत नाही तोपर्यंत केंद्र शासनाकडून निधी मिळत नाही. केंद्र शासनाकडून निधी मिळविण्यात जो गॅप निर्माण झाला त्यामुळे मजुरीचे वाटप करण्यास विलंब झाला आहे. सध्या मस्टर पासिंग ॲथॉरिटी तहसीलदारांकडे आहे. गटविकास अधिकारी यांच्याकडून तहसीलदारांकडे मस्टर गेल्यानंतर व त्यांनी मंजूर केल्यानंतर निधी मंजूर केला जातो. त्यानंतर तो निधी पोस्टाकडे पाठविला जातो व नंतर मजुरांना मजुरी मिळते. या प्रक्रियेमुळे देखील विलंब होतो. त्यामुळे मस्टर पासिंग ॲथॉरिटी गटविकास अधिकाऱ्यांकडे दिली तर विलंब टाळू शकू. त्याचप्रमाणे केंद्र सरकारकडून निधी मिळेपर्यंत राज्य सरकारने निधी उपलब्ध करून दिला तरी देखील विलंब टाळणे शक्य आहे.

यावर समितीने विचारणा केली की, गेल्या एक वर्षाच्या काळात एक काम एक मोजमाप पुस्तिकेचा वापर करून मजुरी वाटपातील विलंब कमी करण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले.

याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, एकूण १३०९ ग्रामपंचायती आहे. दहा ग्राम पंचायतीच्या मागे एक कनिष्ठ अभियंता असणे आवश्यक आहे. परंतु, ते केवळ ६६ आहेत. ईजीएसच्या कामासाठी मनुष्यबळ कमी आहे. ईजीएसच्या कामासंदर्भात प्रत्येक महिन्यात बैठक घेतली जाते. सन २०१०-२०११ मध्ये मजुरांना ताबडतोब पेमेंट दिले आहे. एप्रिल, मे आणि जून महिन्यात शासनाकडून २५ कोटी रुपयांची मागणी होती त्याप्रमाणे पैसे रिलीज केले आहेत. या कामासाठी जे मनुष्यबळ उपलब्ध आहे त्यांनी प्रशिक्षण घेतलेले नाही त्यामुळे त्यांना चांगले प्रशिक्षण द्यावे लागेल. एका वर्षात चार पट काम केले त्यामुळे या कामासाठी यंत्रणा कमी पडली. यापुढे यात निश्चितपणे सुधारणा करण्यात येईल.

निधीची उपलब्धता करून देणे ही जिल्हाधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. मजुरांना वेळेच्या आत मजुरी मिळाली पाहिजे. मजुरांनी काम केले असल्यामुळे त्यांना मजुरी मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. आक्षेपनिहाय माहिती या विवरणपत्रात देणे आवश्यक होती असे समितीने स्पष्ट केले असता, विभागीय सचिवानी सांगितले की, कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या तसेच कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात येणार आहे. जुने हजेरीपट कार्यालयात जमा करण्यास सांगण्यात आले आहे. एका कामाचे दोन हजेरीपट तयार करण्याबाबत आदेश देण्यात येतील. नऊ दिवसानंतर अभियंत्याला कामाच्या ठिकाणी पाहणी करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पोस्ट ऑफिसद्वारा मजुरांचे करण्यात येत असणारे पेमेंट बँकेतून देण्यास सुरूवात केली आहे. आतापर्यंत १२९१ कोटी रुपये पेमेंटचे वितरण केलेले असून एप्रिल, ऑगस्ट मध्ये ५०० कोटी रूपयांची कामे सुरू केलेली आहेत. यावर कार्यकारी अभियंता, ल.पा, स्था.स्त, नांदेड यांनी मजुरी वाटपासंदर्भात चुकीच्या प्रक्रियेचे समर्थन केल्याने त्यांच्या

विरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता, ल.पा, स्था.स्त., नांदेड यांनी सांगितले की, नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक २०९४/प्र.क्र.२४/रोहयो, दिनांक २८ एप्रिल, १९९४ च्या परिपत्रकाप्रमाणे उप विभागानी कार्यकारी अभियंत्याकडे मागणी करावयाची असते. कार्यकारी अभियंत्यानी एकात्मिक विकास यांच्याकडे मागणी करणे. त्यानंतर एकात्मिक विकास यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे एकत्रित मागणी करावयाची आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडून धनादेश वितरित केला जाऊन तो संबधीताना मिळत असतो. या प्रक्रियेमुळे विलंब झालेला आहे. यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, मागील वर्षी प्रत्येक जिल्ह्याला केंद्र शासनाकडून निधी मिळत होता. पण या वर्षापासून म्हणजेच सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून एकत्रित निधी मिळण्यास सुरूवात झाली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड या यंत्रणेने ४ आठवड्यापेक्षा जास्त कालावधी मजुरी वाटपास का लावला ? तसेच कनिष्ठ अभियंत्याची संख्या किती आहे व एका कनिष्ठ अभियंत्याकडे कामाची संख्या किती आहे. याबाबत बैठकीच्या वेळी पुढीलप्रमाणे लेखी खुलासा सादर केला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २१ हजेरीपटांमध्ये ०४ आठवड्यांपेक्षा जास्त उशीर झाला आहे. सदरचा उशीर हा फक्त २१ हजेरीपटात झालेला असून सदरच्या २१ हजेरीपटांपैकी १६ हजेरीपट हे एकाच शाखा अभियंत्याकडे होते. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत एकूण कनिष्ठ अभियंत्याची संख्या ३७ आहे. सदरहू हजेरीपटाच्या बाबतीत निधी मागणी व वाटपाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| अनुक्रमांक | मागणी | निधी प्राप्त दिनांक | मजुरी वाटप दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ०२ मे २००५ | ०२ जून २००५ | ०४ जून २००५ |
| २ | २० मे २००५ | २७ जून २००५ | २९ जून २००५ |
| ३ | २७ जुलै २००५ | २३ ऑगस्ट २००५ | २५ ऑगस्ट २००५ |
| ४ | ०६ डिसेंबर २००५ | २९ डिसेंबर २००५ | ०४ जानेवारी २००६ |

समितीने पुढे अशी विचारणा केली की, यंत्रणेने या कामांना सुरूवात केव्हा केली? काम पूर्ण झाल्यानंतर व चार आठवडे होऊन गेल्यानंतर यंत्रणेने शासनाकडे निधीची मागणी केली. याठिकाणी मागणी केल्याची तारीख दिली आहे, निधी प्राप्त झाल्याची तारीख दिली आहे व मजुरीचे वाटप केल्याची तारीख दिली आहे. परंतु, उशिरा मागणी केल्याबाबतची माहिती दिलेली नाही मागणी उशिरा करण्यात आली असल्यामुळे मजुरी वाटपास विलंब झाला आहे? यंत्रणेने ४ आठवड्यांपेक्षा जास्त कालावधी मजुरी वाटपास का लावला? शासनाकडे मागणी करण्यासाठी झालेल्या विलंबाबद्दल संबंधित शाखाअभियंत्यावर काय कारवाई केली आहे?

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांनी सांगितले की, त्यांनी तीन आठवड्यांच्या आत मस्टर सादर केले आहे. मस्टरवरील जास्तीत जास्त रक्कम ही एप्रिल महिन्यातील आहे. एप्रिल महिन्यामध्ये शासनाकडून निधी यायला विलंब लागला. जून, जुलै महिन्यानंतर निधी मिळायला विलंब लागत नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

**रोजगार हमी योजना ही शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून मजुरांना मजुरी वेळेवर मिळण्याच्या कार्यवाहीवर योजनेची यशस्वीतता अवलंबून आहे. रोजगार हमी योजनेच्या कामांवर काम करीत असलेल्या मजुरांना मजुरी वेळेवर दिली जाते किंवा कसे याबाबत समितीने माहिती घेतली असता मजुरांना मजुरी मिळण्यासाठी चार ते पाच आठवडे वाट पहावी लागते त्यामुळे रोजगार हमीवर काम करण्यास मजूर उत्सुक दिसत नाहीत त्यामुळे या महत्वाकांशी योजनेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन समितीने वारंवार सर्व संबंधितांना मजूराला जास्तीत जास्त दोन आठवड्यांच्या आत मजुरी देण्याबाबत उपाय योजना करण्याच्या सूचना केल्या आहेत तथापि, या बाबत समिती समाधानी नाही. या संदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**(५) अपूर्ण कामे :**

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तके मधील "अपूर्ण कामे" यासंदर्भात समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, ल.पा.स्था.स्तर, नांदेड या यंत्रणेची ५ ते १० वर्षे कालावधीतील १९ कामे अपूर्ण आहेत. १९ कामांपैकी ८ कामे तात्पुरती बंद असल्याचे माहिती पुस्तिकेत नमूद केले आहे तसेच काम "तात्पुरते बंद" म्हणजे नेमके काय ? यासंदर्भात समितीला माहिती द्यावी. यावर कार्यकारी अभियंता, ल.पा.स्था.स्तर, नांदेड यांनी सांगितले की, ५ ते १० वर्षे कालावधीतील अपूर्ण कामांपैकी ५ कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित कामांचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून सन २०१२ अखेरपर्यंत ही कामे पूर्ण करण्यात येतील. काही कामांचे सुधारित अंदाजपत्रक तयार

करण्याचे काम सुरू आहे. यामध्ये एक काम वन जमिनीवरील आहे. ती जमीन हस्तांतरित होत नसल्यामुळे त्या संदर्भात प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. यावर समितीने विचारले की, इतकी वर्षे भूसंपादन का केले नाही ? ५ ते १० वर्षे कालावधीतील अपूर्ण कामे पूर्ण करण्याच्या संदर्भात संबंधित यंत्रणेने हलगर्जीपणा केला आहे. किंबहुना अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नच केले नाही. याबाबत अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, स्थानिक स्तर,औरंगाबाद यांनी सांगितले की, जून,२०१२ पर्यंत हे काम पूर्ण करण्यात येईल.

मजूर उपलब्ध होत नाही हे कारण समितीला पटत नाही. ग्रामपंचायती या कामांची यंत्रणा आहे. ते हे काम करीत नसतील तर, जिल्हाधिकाऱ्यांना तसे कळविले पाहिजे. शासनाचे भांडवल यामध्ये गुंतलेले आहे. अपूर्ण काम पूर्ण होणार नसेल तर हा पैशाचा अपव्यय आहे असे समितीने स्पष्ट केले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पाझर तलाव, वानोळा हे सन २००१ सालातील काम आहे. त्याच्या सुधारित अंदाज पत्रकाला अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. या कामाच्या क्षेत्रात १.२४ हेक्टर वन जमीन येत असल्याचे कारण नमूद करण्यात आले आहे. तथापि, १ हेक्टर व २ हेक्टर वन जमीन संपादन करण्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आले आहेत. १ हेक्टर वन जमिनीची अडचण दूर होऊन किती दिवस झाले आहेत ? आता हे प्रकरण कोणाकडे आहे. यावर वन उपसंरक्षक,नांदेड यांनी सांगितले की, या कामाला मंजुरी दिलेली आहे व दीड वर्ष झाले आहे. तसेच कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, स्थानिक स्तर, नांदेड यांनी सांगितले की, वन तळे शिफ्ट करावयाचे होते, परंतु, वन विभागाने त्याला नकार दिला होता. त्यामुळे जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर ते काम पूर्ण करण्यात येईल.

समितीने पुढे विचारले की, सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी किती कामे प्रलंबित आहेत, कार्यकारी अभियंता तसेच जिल्हाधिकारी याना किती लाखापर्यंत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार आहेत? अधीक्षक अभियंता, ल.पा.स्था.स्तर मंडळ, औरंगाबाद यांनी सांगितले की, कार्यकारी अभियंता यांना २५ लाख रुपयांपर्यंत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना ५० लाख रुपयांपर्यंत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार असल्याचे विभागीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

यंत्रणेने भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुद्धा सुरू केली नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुद्धा अपूर्ण कामे पूर्ण होण्याच्या कामात हलगर्जीपणा दाखविला आहे. त्यामुळे चौकशी करून नियमानुसार कारवाई करावी असे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना समितीने निर्देश दिले की, सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या कामासाठी संबंधितांना बोलविण्यात यावे, ते येत नसतील तर त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. जेथे जेथे भूसंपादनाची प्रक्रिया अपूर्ण राहिली असेल त्यांची प्रकरणे प्रस्तावित केली पाहिजेत. त्यानंतर निधीची मागणी केली पाहिजे. ज्या कामासाठी भूसंपादन करावयाचे आहे त्याबाबतची कार्यवाही त्वरित करावी.

यावर जिल्हाधिकारी नांदेड यांनी समितीला माहिती दिली की, दीड वर्षामध्ये दर ३-४ महिन्यांनी अपूर्ण कामांचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव सर्व यंत्रणांना सादर करण्यास सांगितले आहेत. ज्यांनी वेळेत प्रस्ताव सादर केले आहेत त्यांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. परंतु, या ठिकाणी यंत्रणांकडून संथ गतीने कामे सुरू आहेत हे मान्य करण्यात येत आहे. व ज्या कामाला सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे ती कामे त्यांनी सुरू केली आहेत. परंतु, त्यांनी सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्तावच सादर केले नाही अशी कामे सुरू होऊ शकली नाहीत. जिल्हाधिकारी स्तरावर एक प्रकरण प्रलंबित आहे.

मुखेड तालुक्यातील होटगीरवाडी येथील पाझर तलावाचे काम १४ वर्षांपासून प्रलंबित आहे. या कामाच्या विलंबासाठी जे जबाबदार असतील त्यांच्या वेतनातून वसुली केली पाहिजे. सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या कामासाठी बोलावून सुद्धा अधिकारी/कर्मचारी येत नसतील तर संबंधितांविरुध्द चौकशी करून कारवाई करावी तसेच ज्यावेळी हा पाझर तलाव घेण्यात आला त्यावेळी काळी माती उपलब्ध होती का? कार्यकारी अभियंत्यांच्या स्तरावर किती कामे अपूर्ण आहेत? अशी समितीने विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता, ना.पा.विभाग, नांदेड यांनी सांगितले की, होटगीरवाडी येथील पाझर तलावाचे काम १९९६ पासून बंद आहे. या पाझर तलावासाठी काळी माती उपलब्ध होत नाही. त्यांच्या स्तरावर ४ कामे अपूर्ण आहेत. या चारही पाझर तलावासाठी काळी माती उपलब्ध होत नसल्यामुळे ही कामे अपूर्ण राहिली आहेत. दुसऱ्या ठिकाणच्या सिंचन तलावातील गाळ टाकून ते काम पूर्ण करण्याचे प्रस्तावित केले होते. परंतु, ५ वर्षापूर्वी हा प्रस्ताव सुद्धा मंजूर झाला नाही. त्यानंतर या सिंचन तलावात गाळ उपलब्ध असल्याची खात्री करण्यासाठी यंत्रणा गेली असता तेथील गाळ शेतकऱ्यांनी काढून नेला असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे ९ कि.मी. अंतरावरुन काळी माती आणण्याचे प्रस्तावित केले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, या कामाची किंमत किती झाली आहे ? १४ वर्षांपासून हा पाझर तलाव शेरे पूर्ततेअभावी अपूर्ण राहिला आहे. ६०:४० मध्ये हे काम बसवून पूर्ण करण्यात यावे. याबाबत कार्यकारी अभियंता, ना.पा.विभाग, नांदेड यांनी सांगितले की, या कामाची किंमत रुपये ४४ लाख इतकी झाली आहे. हे काम मापदंडात बसत नसल्यामुळे शासनाकडून प्रस्ताव परत आला आहे.

जिल्हा परिषद बांधकाम विभाग, नांदेड यांची ३७ कामे अपूर्ण आहेत. मजुरांची संख्या ७१ हजारांवर गेली आहे असे असताना सुद्धा अपूर्ण कामे पूर्ण का होत नाही? अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सांगितले की, या कामाच्या संदर्भात यापूर्वी संबंधित यंत्रणेसमवेत बैठका घेतल्या होत्या. एमआरईजीएसमध्ये ९ ते १० हजार मजूर आहेत. तसेच अधीक्षक अभियंता, जिल्हा परिषद, उत्तर नांदेड यांनी सांगितले की, सन २००५ ते २०१० पर्यंत एकूण ४४ कामे होती. त्यापैकी ३१ कामे पूर्णत्वास आलेली असून उर्वरित १३ कामे प्रगतीपथावर आहेत. ती कुशल कामे आहेत. त्यांचे सुधारित अंदाजपत्रक झाले असून मार्चपर्यंत नियोजन पूर्ण केले जाणार आहे. यानंतर समितीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांनी त्यांच्या कामाबाबत सद्य:स्थिती समितीला विषद करावी असे निदेश दिले असता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम यांनी समितीला माहिती दिली की, दोन कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित ६ कामे डिसेंबर पर्यंत पूर्ण केली जातील.

अपुर्ण कामांच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांनी ८ दिवसाच्या आत संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन कामे पुर्ण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे समितीने स्पष्ट आदेश जिल्हाधिकारी याना दिले.

जिल्हा बैठकीत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक २८ ऑगस्ट व २१ नोव्हेंबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासनानुसार समितीला पुढीलप्रमाणे लेखी माहिती दिली.

कार्यकारी अभियंता, ल.पा.स्था.स्तर, नांदेड या यंत्रणेची ५ ते १० वर्षातील १९ अपूर्ण कामापैकी ५ कामे पुर्ण झाली व १४ कामे अपूर्ण होती. सदरील एकूण १९ अपुर्ण कामाबाबतची सद्य:स्थिती, काम पुर्ण करण्यासाठी केलेले प्रयत्न काम निकाली काढणे बाबत केलेले प्रयत्न या बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

रोजगार हमी योजना समिती विधान मंडळ, जिल्हा बैठक ऑगस्ट-२०११ ते दिनांक १५ ऑक्टोबर २०१२ पर्यंत पुर्ण झालेली व रोहयो मधून वगळण्यात आलेली काम.

(१) वर्ताळा पा.त.ता.मुखेड : काम पूर्ण ६/२०१२

(२) नरपटवाडी पा.त. : रोहयो मधून वगळण्यात आले आहे.

(३) वानोळा पा.त. : रोहयो मधून वगळण्यात आले आहे.

(४) लखमापूर पा.त : रोहयो मधून वगळण्यात आले आहे.

(५) तांदळा पा. त. : रोहयो मधून वगळण्यात आले आहे.

रोजगार हमी योजनेतून वगळण्यांत आलेली व पूर्ण झालेली एकूण : ५ कामे.

दिनांक १५ ऑक्टोबर २०१२ अखेर पूर्ण असलेली कामे : ०९ सदरील १० अपूर्ण कामाबाबत या विभागाकडून केलेली कार्यवाही, सुधारित अंदाजपत्रकाची सद्य:स्थिती, कामाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

(१) सुधारित प्रशासकीय मंजूरीसाठी मा.आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून शासनास सादर केलेली कामे १ घुगेवाडी पा.त.२ डोंगरगांव तांडा पा.त. : २ कामे

(२) सुधारित प्रशासकीय मान्यता त्रुटी साठी यंत्रणेकडे परत केलेली अंदाजपत्रक : १.चंद्रपूर पा.त २.मांडवा पा.त. : २ कामे

(३) निविदा स्तरावर असलेली कामे : १.मेंडकी पा.त. २.हरताळा पा.त : २ कामे

(४) रोहयोतून वगळण्यासाठी प्रस्तावित कामे लिंगी पा.त. मा.अधीक्षक अभियंता ल.पा. स्था.स्तर मंडळ, औरंगाबाद यांनी निधी उपलब्ध बाबत हमी सादर : १ काम

(५) सुधारित तांत्रिक मान्यतेसाठी मा.मुख्य अभियंता ल.पा. स्था.स्तर. पुणे-६ यांच्याकडे सादर केलेले काम १.हिराबोरी तांडा पा.त. : १ काम

(६) सुधारित तांत्रिक मान्यता त्रुटी साठी यंत्रणेकडे परत केलेली अंदाजपत्रक :

१. दगरसांगवी पा.त. : १ काम अशी एकूण ९ कामे

उपरोक्त ०९ कामे ३/२०१२ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन कार्यकारी अभियंता ल.पा.स्था.स्तर, नांदेड यांनी नियोजन केले आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था. स्तर), नांदेड या यंत्रणेची ५ ते १० वर्षात १९ अपुर्ण कामांपैकी ५ कामे पुर्ण झाली असून १४ अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी वन जमीन हस्तांतर व सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी वेळीच सादर न केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली? तसेच सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे? वगळण्यात आलेल्या कामावर शासनाचा किती निधी वापरण्यात आला आहे?

कार्यकारी अभियंता, ल.पा.स्था.स्तर, नांदेड यांनी सांगितले की, अपुर्ण कामास जबाबदार असणाऱ्या सर्व तत्कालिन ०७ कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस पाठविली असून त्यापैकी ०२ कार्यकारी अभियंता यांचे खुलासे प्राप्त झाले असून उर्वरित ०५ तत्कालिन कार्यकारी अभियंते यांचे खुलासे प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येतील. उप विभागीय स्तरावर तत्कालीन उप विभागीय अधिकारी, क्षेत्रिय अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या असून त्यापैकी ०४ क्षेत्रिय अभियंता व ०३ उप विभागीय अभियंता असे एकूण ०७ खुलासे प्राप्त झाले असून त्याबाबत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

यासंदर्भात साक्षीच्या वेळी कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था. स्तर), नांदेड यांनी सांगितले की, एकूण १९ कामांपैकी ५ कामे पूर्वी पुर्ण झाली होती. त्यानंतरच्या काळात १ काम पुर्ण केले म्हणजे एकूण ६ कामे पुर्ण केली. उर्वरित १३ कामापैकी ३ कामे वगळण्यास मान्यता मिळाली असून त्याचे प्रस्ताव लवकरच सादर करण्यात येणार आहे. उरलेल्या १० कामांपैकी ३ कामाच्या निविदा करण्यात आल्या असून ४ कामांना प्रशासकीय मंजुरी देवुन येत्या ३ महिन्यात ही कामे पुर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सांगितले की, याबाबतीत एकूण ७ कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या आहेत. तसेच ११ उप अभियंता, २१ कनिष्ठ अभियंता यांना देखील कारणे दाखवा नोटीसा दिल्या आहेत. ७ कार्यकारी अभियंत्यापैकी २ कार्यकारी अभियंत्यांचे खुलासे आले आहे. ते खुलासे उशीरा सादर केल्याने ते मान्य केले नाहीत. ३ उप अभियंते यांचे खुलासे प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे २१ पैकी ४ कनिष्ठ अभियंत्यांचे खुलासे आले आहेत. ज्यांचे खुलासे प्राप्त झाले नाही तसेच खुलासे समाधानकारक आले नाही. त्यांच्याबाबतीत पुढील कारवाई करण्याबाबतचे प्रस्ताव अधीक्षक अभियंता यांच्यामार्फत शासनाकडे पाठविण्यातबाबत त्यांना विनंती करण्यात येईल. व सदर प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांनी अधीक्षक अभियंता यांचेकडे पाठवावेत अशा प्रकारचे आदेश त्यांना देण्यात येतील.

समितीने पुढे विचारणा केली की, १४ अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी वन जमीन हस्तांतर व सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी वेळीच सादर न केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्याकडून याबाबतीत झालेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर काय कारवाई केली याबाबत सद्यःस्थिती काय आहे?

यावर कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था.स्तर), नांदेड यांनी अशी माहिती दिली की, वानवा पाझर तलावाची जमीन आपल्या नावावर हस्तातरीत न झाल्यामुळे विलंब झाला होता. त्याकरीता पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास लवकर मंजुरी मिळाली नाही म्हणून विलंब झाला. डी.एस.आर. बदलल्यामुळे अद्ययावत करण्यास विलंब लागला आहे. सदरचे काम विभागामार्फत लवकरात लवकर पुर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

नांदेड येथील बैठकीमध्ये प्रस्तुत विषय उपस्थित करण्यात आला त्यावेळी समितीने जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्तांना यासंबंधी कारवाई करण्यास सांगितल्यानंतर याबाबत आतापर्यन्त काय कारवाई केली? याची समितीला माहिती द्यावी. यावर कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था. स्तर), नांदेड यांनी सांगितले की, संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिस दिली आहे. त्यानंतर त्यांच्याकडून सुधारित अंदाजपत्रक करून घेतले आहे. समितीने पुढे विचारणा केली की, कारणे दाखवा नोटिशीला त्यांच्याकडून खुलासा करण्यात आला आहे काय? कारणे दाखवा नोटिस केव्हा देण्यात आली? आणि सहा महिन्याच्या कालावधीत त्यांच्याकडून खुलासा का मागविण्यात आला नाही? यावर कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था. स्तर), नांदेड यांनी सांगितले की, कारणे दाखवा नोटीसचा खुलासा आलेला नाही. कारणे दाखवा नोटीस दिल्यावर ६ महिन्याचा कालावधी झाला असल्याने पुढील करवाई करण्यात येईल.

समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता ल.पा विभाग नांदेड या यंत्रणेकडे काळ्या माती अभावी अपुर्ण असलेली ४ पाझर तलावाची कामे पुर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली व या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली? अशी विचारणा समितीने केली.

रोहयो अंतर्गतची खालील ४ पाझर/गाव तलावांची कामे ही कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, नांदेड यांचेकडील नसून कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड या विभागाची आहेत. त्यानुसार नांदेड पाटबंधारे विभागाची ०४ पाझर/गावतलावाची कामे पुर्ण आहेत.

(१) होडगीरवाडी पाझर तलाव, ता.मुखेड, जि.नांदेड

(२) सुगांव पैसमाळ पाझर तलाव, ता.मुखेड, जि.नांदेड

(३) बापशेटवाडी पाझर तलाव, ता.मुखेड, जि.नांदेड

(४) पैसमाळ गाव तलाव, ता.मुखेड, जि.नांदेड

उपरोक्त ४ कामे ही मुख्यत्वे करून तलावाच्या बुडीत क्षेत्रात गाभाभागासाठी आवश्यक असलेली काळी माती उपलब्ध नसल्यामुळे मागील १० ते १५ वर्षापासून अपूर्ण राहिलेली असून ती कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(१) तलावाच्या बुडित क्षेत्रात काळी माती उपलब्ध नसल्यामुळे काळी माती जेथून उपलब्ध होऊ शकते त्यानुसार सुधारित वाहन अंतर घेऊन या तलावाची सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीची अंदाजपत्रके करणे आवश्यक ठरल्यामुळे त्यानुसार सुधारित अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही करण्यात आली. तथापि, सदर सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकास मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर असताना या दरम्यानच्या कालावधीत वेगवेगळ्या स्तरावर शेरे उपस्थिती होणे, त्यांचे निराकरण करून पुर्नसादरीकरण करणे आणि वेळोवेळी खात्याची अद्यावत दरसूची लागू होणे इत्यादी कारणामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात वारंवार बदल करावे लागले.

(२) तसेच सुधारित अंदाजत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून अपुर्ण कामे करण्याबाबत झालेल्या विलंबाबत तसेच काळी माती पुरेशी उपलब्ध नसताना अंदाजपत्रकास ०३ कार्यकारी अभियंता यांचे कार्यकाळात तांत्रिक मान्यता प्रदान केली त्यांच्याकडून खुलासा/ स्पष्टीकरण मागविले आहे.

(३) तसेच तत्कालीन ०६ उप विभागीय अधिकारी/ शाखा अभियंता यांना अंदाजपत्रकास त्वरीत सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करून अपुर्ण कामे पुर्ण करण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत खुलासा मागितला आहे. त्यानुसार पुढील जबाबदारी निश्चितीची कार्यवाही करण्यात येते आहे.

(४) शासन निर्णय क्र रोहयो, २०११/ प्र.क्र.२३/ रोहयो-४,दिनांक १५ सप्टेंबर २०११ अन्वये प्राप्त झालेल्या सुचनानूसार या ४ कामाच्या अद्यावत किंमतीचा आढावा घेण्यात आलेला असून त्यानुसार झालेला खर्च १० टक्के पेक्षा कमी येत असल्यामुळे सदर ४ कामे शासन निर्णय क्र.रोहयो२०११/प्र.क्र ५३/रोहयो-४, दिनांक १५ सप्टेंबर २०११ मधील निकषानुसार रोहयो मधून वगळणे शक्य होत नसल्यामुळे त्यानुसार आवश्यक प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून या साठी आवश्यक खात्याअंतर्गत निधी उपलब्धतेचे प्रमाणपत्र देण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.नांपविना/तांशा/ दिनांक ४/१४८९ दिनांक १५ मार्च २०१२ अन्वये अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी विनंती केलेली आहे. याबाबत अधीक्षक अभियंता, नां.प मंडळ ,नांदेड यांनी पत्र क्र. नांपाम/तांशी-५/धा.क्र.२६८६/४२६२ दिनांक ३० मार्च २०१२ अन्वये मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी याबाबत काय कार्यपध्दती अवलंबवावी याबाबत मार्गदर्शन मागितले आहे. त्याचबरोबर २७०१ ल.पा.योजनेची कामे (० ते १०० हे) या लेखाशिर्षातून जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांच्याकडून जिल्हा परिषदकडील लघु पाटबंधारे विभागाकडे अपुर्ण कामे पुर्ण करण्यासाठी निधी उपलब्धता प्रमाणपत्र करणेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन ही कामे इतर योजनेतून पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सदरहू कामे लघु पाटबंधारे विभागाची नसून ती कामे पाटबंधारे विभाग, नांदेड यांच्याकडील आहेत. सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून अपुर्ण कामे पुर्ण करण्याबद्दल झालेल्या विलंबाबाबत तसेच काळी माती पुरेशी उपलब्ध नसताना अंदाजपत्रकास तीन कार्यकारी अभियंत्यांचे कार्यकाळात तांत्रिक मान्यता प्रदान केली. त्यामुळे सदरहू कार्यकारी अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत. तसेच ६ उप अभियंता यांना देखील या कामी कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, होडगिरवाडी पाझर तलावाची किती टक्के कामे पुर्ण झाली आहेत व या कामांची अंदाजपत्रके कोणी तयार केली.

याबाबत कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग यांनी सांगितले की, चारही पाझर तलावांची कामे त्यांच्या विभागाची असून ती कामे सन १९९२-९७ या कालावधीत सुरू झाली आहे. परंतू ती कामे अजून अपूर्णावस्थेत आहे. ६ ते ७ टक्के कामे पुर्ण झाली आहेत. कार्यकारी अभियंता यांनी सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. अंदाजपत्रक तयार करताना काळी माती कोठून आणावयाची याचा विचार केला गेला नाही. काळी माती पुरेशी उपलब्ध नसताना सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले गेले. १० ते १५ मीटर अंतरावरुन काळी माती आणता येईल असा विचार करून सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले गेले. परंतु आता तेथील परिस्थिती अशी आहे की, त्यातील एका पाझर तलावाच्या कामासाठी २१ कि.मी.अंतरावरुन काळी माती आणावी लागणार आहे. तीन कामासाठी १५ कि.मी.अंतरावरुन काळी माती आणावी लागणार आहे.

याबाबतीत समितीने स्पष्ट केले की, अंदाजपत्रक तयार केलेल्या व तांत्रिक मान्यता दिलेल्या अधिकाऱ्यांनी त्यावेळी ही बाब लक्षात न घेतल्याने व दुर्लक्षीत केल्याने ही स्थिती उद्भवली असल्याचे समितीस वाटत असून या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली? अशी समितीने विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग यांनी सांगितले की, या संदर्भात गेल्या ६ महिन्यांत संबंधित ३ कार्यकारी अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येवून त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, कारणे दाखवा नोटीसा बजाविलेल्या कार्यकारी अभियंत्याकडून खुलासे प्राप्त झाले आहेत काय? त्यावर कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग यांनी सांगितले की, कारणे दाखवा नोटीसा बजाविलेल्या ३ कार्यकारी अभियंत्यापैकी २ कार्यकारी अभियंत्यांकडून खुलासे प्राप्त झाले आहे.

सन १९९२-९३ मधील सदरहू प्रकरणातील त्रुटी सन १९९७ पर्यंत उजेडात आल्या. सन १९९७ पासून आतापर्यंत जवळपास १५ वर्षे पूर्ण झाली आहेत. प्रशासनाने या संदर्भात संबंधितांवर कोणती कारवाई केली? असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन १९९७ पासून या प्रकरणी विलंब झाला आहे, हे मान्य करण्यात येत आहे.

समितीने पुढे स्पष्ट केले की, सदर काम १० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहे. असे आपण सांगता सदर कामासाठी काळी माती २१ कि.मी. वरून आणावी लागत होती, हे आपल्याच सांगण्यावरून समितीच्या निदर्शनास आले आहे. हे काम जवळपास १५-२० लाख रुपयांचे आहे. काळी माती २१ कि.मी. वरून आणून काम होणार असेल तर हे काही बरोबर नाही. सदर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर १५ वर्षांनंतरही कारवाई होत नसेल तर ही गंभीर बाब आहे. कारणे दाखवा ज्ञापन बजाविलेल्या ३ अभियंत्यांपैकी २ अभियंत्यांकडून खुलासा प्राप्त झाल्याचे आताच आपण सांगितले आहे. मग आता आपण संबंधित दोषींवर कोणती कारवाई करणार आहात? आता ते अधिकारी कदाचित सेवानिवृत्त देखील झाले असतील किंवा होणार असतील. संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे? रोजगार हमी योजनेच्या कामांची स्थिती अशीच झाली आहे. बऱ्याच ठिकाणी प्रशासनाचे कामच हास्यास्पद झाले आहे आणि त्यातील हा एक नमुना आहे. हे काम फक्त ५-१० टक्केच पूर्ण झाले आहे. काळी माती आणण्याच्या संदर्भात १०० मिटरचा निकष आहे. परंतु, सदर कामासाठी २१ कि.मी. वरून काळी माती आणावी लागत होती. सुधारित अंदाजपत्रक तयार करणे, अंदाजपत्रकातील त्रुटींची पूर्तता करणे, विभागीय स्तरावर अंदाजपत्रक जाणे व येणे यामध्येच १५ वर्षांचा काळ गेला आहे. सदर काम वगळावे किवा दुसऱ्या यंत्रणेला द्यावे. अधिकाऱ्यांच्या चुकीच्या वागण्यामुळे सर्व पैसे मातीत गेले आहेत. अशा अधिकाऱ्यांवर काहीही कारवाई केली गेलेली नाही. मग एवढे सर्व करण्यामधून आऊटपूट काय निघणार आहे?

यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, संबंधित कामाच्या फाईलचा अभ्यास केला असता असे दिसले आहे की, होडगीरवाडी पाझर तलाव, हे काम सन १९९७ ला हाती घेतले. भूधारकाने सन १९९८ मध्ये या संदर्भात न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. सन २००१ मध्ये न्यायालयाने या संदर्भात निर्णय दिला. तेव्हापासून आजपर्यंत या कामाच्या संदर्भातील फाईल ७१ वेळा उप विभाग, मंडळ, आयुक्तस्तर, शासन स्तर येथे गेली आहे. त्याचप्रमाणे सदर कामाच्या संदर्भातील नस्ती कोणत्या स्तरावर किती दिवस थांबली, याबाबत तपासले आहे आणि त्यानुसार कार्यकारी अभियंत्यांना कारणे दाखवा ज्ञापन बजाविले आहे, त्यातील २ कार्यकारी अभियंत्यांकडून खुलासा प्राप्त झाला आहे. तसेच कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग यांनी सांगितले की, सदर कामाला ३ वेळा तांत्रिक मान्यता दिली आहे. शासनाकडून २ वेळा ही फाईल परत आली आहे.

सदर चारही कामे वगळण्याचा प्रस्ताव दिलेला असला तरी सदर कामे करण्यासाठी रेग्यूलर निधीतून किंवा डीपीडीसीच्या निधीतून तरतूद करणार आहात का? अशी समितीने विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग यांनी सकारात्मक उत्तर दिले.

या संदर्भातील अनुपालन अहवाल मागविला जाईल, त्यावेळी ही कामे पूर्ण झालेली असावीत असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, डीपीडीसीमध्ये १०० हेक्टरला पैसे नगन्य मिळतात. या वर्षी ३ कोटी रुपये मिळाले होते. डीपीडीसीतील सन्माननीय सदस्यांची भावना अशी असते की, नवीन कामे घ्यावीत, जुन्या कामांसाठी पैसे देण्यात येणार नाहीत. परिणामी, जुन्या कामांसाठीच्या निधीला मंजुरी मिळत नाही. प्रस्तुत प्रकरणी शासनाने विशेष निधी दिला तर बरे होईल.

यावर विभागीय सचिवानी सांगितले की, शासनाने गेल्या २ वर्षांत रोजगार हमी योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी जवळपास १५० कोटी रुपये दिले आहेत. रोजगार हमी योजनेची कामे दिनांक ३० जून, २०१३ पर्यंत पूर्ण करण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळाचा निर्णय झाला आहे. सदर कामे अनेक वर्षांपासूनची आहेत. मराठवाड्यामध्ये जुन्या कामांचा प्रश्न ८० टक्के आहे. अपूर्ण कामांच्या संदर्भात बीड जिल्ह्यात जास्त अडचण आहे. या संदर्भात नक्की काय करावे, हे पहावे लागेल.

सन १९९२ पासून सुरू झालेली ही कामे आहेत. १५ वर्षांनंतर ती कामे परत घेऊ शकतो का? नवीन रोजगार हमी योजनेमध्ये आता ती कामे पूर्ण करणार आहात का? जिल्ह्यातील सन्माननीय सदस्यांनी व जिल्हाधिकारी यांनी या संदर्भात प्लॅन तयार करून डीपीडीसीमध्ये प्रयत्न केला पाहिजे. किवा सदर कामे नरेगामधून केली पाहिजेत असे समितीने स्पष्ट केले असता विभागीय सचिवानी सांगितले की, जुन्या रोजगार हमी योजनेतून ही कामे करण्यास वेळ लागेल. निधीचे नियोजन करून ही कामे लवकर होऊ शकतील.

समितीने स्पष्ट केले की, सदर कामे जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये बसत असतील तर ती पूर्ण करावीत अन्यथा कोणत्याही योजनेतून कामे करावीत. परंतु, तलावे देण्यात यावीत.यावर विभागीय सचिवानी सांगितले की,या संदर्भात अभियंत्यांशी चर्चा करण्यात येईल. अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे गरजेचे असते. संबंधित अधिकाऱ्यांकडून सदर कामांसाठी आवश्यक असलेल्या किंमतीपेक्षा जास्त

किंमत दाखविली जाते. उदा. एखादे काम १०० कोटी रुपयांमध्ये होणार असेल तर ते ४०० कोटी रुपयांचे दाखविले जाते. अधिकाऱ्यांकडून कामाच्या संदर्भात अशा प्रकारे चार पट किंमत दाखविली जाते. परिणामी, वित्त विभागाकडून सदर कामाची नस्ती त्रुटी काढून परत पाठविली जाते. त्यामुळे अपूर्ण कामांच्या संदर्भात सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यामध्ये अडचणी निर्माण होतात.

समितीने पुढे असेही स्पष्ट केले की, या संदर्भात संबंधित अभियंत्यांशी चर्चा करून योग्य कार्यवाही करावी आणि समितीला अवगत करावे. प्रस्तुत विषय सचिव स्तरावर सोडवावा. कामे ५-१० टक्के पूर्ण झाली असतील तर ती वगळण्यात यावीत. १५ वर्षांपूर्वीची ही कामे फक्त ५-१० टक्के पूर्ण झाली असतील तर आजच्या घडीला त्या जागेवर काहीही शिल्लक नसेल. तथापि सदर कामे वगळण्यासंदर्भात किंवा कामे पूर्ण करण्यासंदर्भात निधी कुठून घ्यायचा या संदर्भात सचिव स्तरावर निर्णय घ्यावा आणि संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

**अभिप्राय व शिफारशी :**

**नांदेड जिल्ह्यात रोहयो अंतर्गत विविध यंत्रणाकडे ५ ते १० वर्ष कालावधीतील एकूण १९ कामे अपूर्ण असल्याची माहिती बैठकीच्या वेळी देण्यात आली होती. तसेच ग्रामपंचायती या कामांची यंत्रणा असताना मजूर उपलब्ध होत नाही हे कारण समितीला पटत नाही. सदरची कामे अपूर्ण असल्याने शासनाने या कामास दिलेला निधी विनाकारण गुंतून राहिला आहे. या संदर्भात संबंधित यंत्रणेने अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नच केले नाहीत असे समितीचे मत आहे.**

**मुखेड तालुक्यातील होटगीरवाडी येथील पाझर तलावाचे प्रशासकीय मंजुरीसाठी गेली १४ वर्ष नस्ती विभागातील अधिकाऱ्यांमध्ये फिरत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे हे काम १४ वर्षांपासून प्रलंबित आहे. या कामाच्या विलंबासाठी जे जबाबदार असतील त्यांच्या वेतनातून वसुली केली पाहिजे. सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या कामासाठी बोलावून सुद्धा अधिकारी/कर्मचारी येत नसतील तर संबंधितांविरुद्ध योग्य ती कारवाई करणे गरजेचे आहे.**

**अपूर्ण कामे वर्षानुवर्ष प्रलंबित राहतात. अधिकारी वर्ग या कामात लक्ष घालीत नाहीत त्यामुळे अशी अपूर्ण कामे पूर्ण करण्यास विलंब लागत असल्याने प्रस्तावित कामे वेळीच पूर्ण न झाल्यामुळे त्या कामाची किंमत देखील वाढते व अशा वाढीव किंमतीचा भूर्दंड नाहक शासनावर पडतो. म्हणून ज्या वर्षात यंत्रणेने कामे प्रस्तावित केली आहेत व ज्यासाठी शासनाकडून निधी प्राप्त झाला आहे. अशी कामे त्या-त्या वर्षात व त्याच कामासाठी वापरण्यात यावी व विहित केलेल्या कालावधीतच कामे पूर्ण झाली पाहिजे असा समितीचा आग्रह आहे. तसेच अपुर्ण कामे ५-१० टक्के पूर्ण झाली असतील तर ती वगळण्यात यावीत. १५ वर्षांपूर्वीची ही कामे फक्त ५-१० टक्के पूर्ण झाली असतील तर आजच्या घडीला त्या जागेवर काहीही शिल्लक नसेल. तथापि, सदर कामे वगळण्यासंदर्भात किंवा कामे पूर्ण करण्यासंदर्भात निधी कुठून घ्यायचा या संदर्भात सचिव स्तरावर निर्णय घ्यावा आणि संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. यासंदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(६) गैरव्यवहाराची प्रकरणे :**

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमधील "गैरव्यवहाराची प्रकरणे" पुढीलप्रमाणे होती या संदर्भात समितीने विचारणा केली की, जिल्हा स्तरावर अ.क्र.२,३,४,५,६,७,८ व १० ही प्रलंबित प्रकरणे अनुपालनासाठी आहे. अनुपालन म्हणजे काय? तसेच अ.क्र. १ व ९ प्रकरण हे विभागीय चौकशीकरिता शासन स्तरावर आहे यासंदर्भात समितीला माहिती देण्यात यावी.

यावर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सांगितले की, चौकशी अहवाल आले आहे. त्यांची छाननी करून पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे. काही प्रकरणे विभागीय आयुक्तांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे. तसेच दिनांक २१ नोव्हेंबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, समितीने भेट दिली त्यावेळी १० प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ३ प्रकरणात शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात आला असून उर्वरित ७ प्रकरणापैकी २ प्रकरणे शासनाकडे पाठविण्यात आली आहेत. ४ प्रकरणे विभागीय चौकशी स्तरावर व १ प्रकरण जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर प्रलंबित आहे. त्यामुळे सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, दिनांक १६ नोव्हेंबर रोजी ही प्रकरणे शासनाला प्राप्त झाली असून १५ दिवसांत ती निकाली काढण्यात येतील. सदरहू गैरव्यवहाराची सर्व प्रकरणे तीन महिन्याच्या आत निकालात काढण्यात यावी असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

**अभिप्राय व शिफारशी :**

**सन २००४ ते २०११ या कालावधी अखेर आढळून आलेल्या १० गैरव्यवहाराच्या प्रकरणांची चौकशी अपूर्ण आहे. या प्रकरणापैकी ३ प्रकरणांचा शासनाने निर्णय घेतला असून उर्वरित ७ प्रकरणापैकी २ प्रकरणे शासनाकडे, ४ प्रकरणे विभागीय चौकशी स्तरावर व १ प्रकरण जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे. शासनाकडील प्रकरणे १५ दिवसांत निकाली काढण्यात येतील असे**

**आश्वासित केले आहे. तथापि, विभागीय चौकशी स्तरावरील प्रकरणांवरील कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर पुर्ण करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी व या संदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(७) सिंचन विहिरी :**

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक १७ ऑगस्ट २०११ रोजीच्या बैठकीत क वर्ग नगरपरिषदेच्या हद्दीत सिंचन विहिरींची कामे घेण्यात यावीत अशी लाभार्थ्यांची मागणी असल्याचे जिल्हाधिकारी, नांदेड यांनी समितीला माहिती दिली होती. त्या अनुषंगाने समितीने दिनांक २८ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या बैठकीत विचारणा केली की, क वर्ग नगरपरिषद हद्दीत सिंचन विहिरींची कामे घ्यावीत अशा प्रकारचा लाभार्थ्यांच्या मागणीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय? या प्रश्नाला उत्तर देतांना क वर्ग नगरपालिका क्षेत्रासाठी योजना तयार करण्याकरिता परिपत्रकाद्वारे त्रिसदस्यीय अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे असे म्हटले आहे. या अभ्यासगटाच्या आतापर्यन्त किती बैठका झाल्या आहेत, त्यांचा अंतिम अहवाल केव्हा प्राप्त होणार आहे, त्यामध्ये कोणता निर्णय घेण्यात आला आहे? याची समितीला माहिती देण्यात यावी.

यावर उपायुक्त, (रोहयो) यांनी सांगितले की, नांदेड येथील जिल्हा बैठकीत.समितीच्या माननीय सदस्यांनी क वर्ग नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे घेता येतात काय अशी विचारणा केली होती. त्यावेळी अशाप्रकारे कामे घेता येत नाहीत परंतु नगरपरिषदेच्या क्षेत्राला लागून असलेला काही भाग ग्रामीण असल्यामुळे त्या भागामध्ये कामे घेण्यास हरकत नाही. तरी सुद्धा त्यामध्ये कायदेशीर अडचण असल्याचे सांगण्यात आले होते. अशाप्रकारे कायदेशीर अडचण येत असेल तर त्यासंबंधी प्रस्ताव तयार करून तो शासनाला सादर करावा व शासनाने त्यावर विचार करावा असे सुचविण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव तयार केला आहे.

विभागीय सचिवांनी माहिती दिली की, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ मध्ये ग्रामीण भागाच्या व्याख्येमध्ये क वर्ग नगरपालिकेचा समावेश होत नाही. राज्यातील काही क वर्ग नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्राच्या आसपास असलेल्या ग्रामपंचायतींना कामे देण्यात येत होती. परंतु त्यांचे प्रमाण अतिशय नगण्य आहे. त्यानंतर सन २००६ मध्ये नरेगा योजना सुरू करण्यात आल्यानंतर ती फक्त ग्रामीण भागासाठी असून त्याकरिता ग्रामीण भागामध्ये जॉबकार्ड देणे आवश्यक आहे. त्यामुळे क वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये नरेगा योजनेमधून कामे घेता येत नाहीत. क वर्ग नगरपालिकेसाठी शासनाने स्वतंत्र समिती स्थापन केली आहे. तिची बैठक १२ जुलै २०१२ रोजी झाल्यानंतर आम्ही परिपत्रक वितरित केले आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, १२ जुलै २०१२ रोजी शासनाने परिपत्रक निर्गमित केले. त्याकरिता अभ्यासगटाच्या माध्यमातून एक समिती नियुक्त करून तिच्यामार्फत योजनेचा अभ्यास करणार आहात का ? या ठिकाणी प्रश्न असा आहे की, या योजनेचा ब वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये समावेश करण्यासंदर्भात अभ्यास गटाकडून काही रिपोर्टींग करण्यात आले आहे काय? त्या संदर्भात समितीने आपल्याला एक पत्र पाठविले होते ते आपणास मिळाले काय?

विभागीय सचिवांनी माहिती दिली की, क वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये मगांराग्रारोहयोतंर्गत कामांचा समावेश करता येत नाही. हा कायदा फक्त ग्रामीण भागासाठी लागू आहे. त्यामध्ये केंद्रीय योजनांचा समावेश असून महाराष्ट्र राज्याच्या ॲक्टखाली स्वतंत्र योजना राबवीत आहोत.

क वर्ग नगरपरिषदेबरोबर ब वर्ग नगरपरिषदेचे कार्यक्षेत्र सुद्धा या योजनेमध्ये समावून घेण्यात यावे असे सूचित केले होते. याचे कारण असे की, काही क वर्ग नगरपरिषदा ब वर्ग नगरपरिषदांमध्ये गेल्या आहेत तरीसुद्धा तो भाग अजूनही ग्रामीण आहे. त्याठिकाणी वाड्या वस्त्या सामावून घेतल्या असल्या तरी त्या क्षेत्रामध्ये उत्पन्नाच्या फार मोठ्या बाबी नाहीत. किंवा ती नगरपरिषद आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे अशातला भाग नाही. या करिता मागील बैठकीमध्ये सुचविले असले तरी आज पुन्हा सुचविण्यात येत आहे की, या योजनेचा समावेश ब वर्ग नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये करण्यात यावा. याकरिता अभ्यासगटामध्ये ही बाब विचारार्थ घेण्यात यावी. तसेच क वर्ग नगरपालिका या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाला जोडून तयार केल्या आहेत. क वर्ग नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये तीन-चार गावांचा समावेश होत असेल तर अशाप्रकारे संपूर्णपणे ग्रामीण असलेल्या क वर्ग नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये ही योजना राबविण्याबाबत शासनाने पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. विभागीय सचिव यांनी दिलेल्या उत्तरानुसार क वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये या योजनेचा विचार होणार नसेल तर ब वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये विचार करण्याची गरज नाही अशी समितीची सूचना आहे.

विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ घोषित करण्यात आला त्यानंतर केंद्र शासनाने सन २००६ मध्ये कायदा संमत केला. हा कायदा महाराष्ट्र शासनाने स्वीकारावा किंवा त्यावरील आपला निर्णय राखून ठेवावा. इतर राज्यांनी केंद्र शासनाचा कायदा स्वीकारला आपल्या राज्यामध्ये स्वतंत्र अधिनियम नाही. परंतु महाराष्ट्र राज्याची हिस्टॉरिकल पार्श्वभूमी लक्षात घेता सेक्शन २८ नुसार आपल्या राज्यामध्ये यापेक्षा एखादी चांगली योजना राबविता येत असेल तर ती राबविण्याचा आपल्याला अधिकार आहे. सद्याच्या

कायद्यानुसार आपण दोन गोष्टींची अंमलबजावणी करीत आहोत. एक म्हणजे केंद्र शासनाची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये समाविष्ट करता येत नाही. परंतु महाराष्ट्र राज्यासाठी लागू असलेल्या कायद्यातील तरतुदीनुसार 'क' वर्ग नगरपालिकेच्या कार्यक्षेत्राचा समावेश त्या योजनेमध्ये करण्यात आला आहे. याकरिता आपल्या राज्याने स्वतंत्र योजना तयार केली नसून ती करण्याची आवश्यकता आहे.

समितीने विचारणा केली की, रोजगार हमी योजनेची निर्मिती महाराष्ट्र राज्यामध्ये झाली आहे. त्यामुळे केंद्र शासनाने जर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्याच्या बाबतीत स्वतंत्रपणे सवलत दिली असेल आणि तशी अधिनियमात तरतूद असेल तर त्याबाबत आपण कार्यवाही केली पाहिजे असे समितीला वाटते. तशी सवलत दिली नसेल तर आजच्या घटकेला ही योजना 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये लागू करण्याची आवश्यकता आहे.तसेच त्रिसदस्यीय समितीची बैठक झाली आहे काय ?

विभागीय सचिवांनी सांगितले की, 'क' वर्ग नगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा समावेश करण्यासंदर्भात प्रक्रिया सुरू करण्यात आली असून लवकरात लवकर ही योजना लागू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत हे ही मान्य करण्यात येत आहे. त्रिसदस्यीय समितीची फक्त एक बैठक झाली असून त्या बैठकीमध्ये कोणकोणती कामे घेता येतील यासंबंधी इश्यू फ्रेम करण्यात आले. रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरीचा दर १४५ रुपये आहे. अकुशल किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या कामांना नगरपालिका मंजुरी देऊ शकते. त्यांना कमीत कमी २ ते ३ कामे तात्काळ सुरू करण्यात यावी व त्याबाबत वर्कआऊट करण्यास सांगितले असून याकरिता विभागास दीड ते दोन महिने लागतील.

'ब' वर्ग नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्राचा समावेश करण्याबाबत समितीने सूचना केली आहे परंतु समितीचा आग्रह नाही. हे करीत असतांना 'क' वर्ग नगरपरिषदेच्या बाबतीत तातडीने निर्णय घेतला तर बऱ्याचशा ग्रामीण भागाला त्या योजनेचा लाभ घेता येईल, तेथील नगरपालिकांना सुद्धा त्याचा लाभ घेता येईल. तरी लवकरात लवकर म्हणजे दीड महिन्यात याबाबत निर्णय घ्यावा अशी समितीने सूचना केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सकारात्मक उत्तर देताना विभागामार्फत लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल. असे स्पष्ट केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**रोजगार हमी योजना "क" वर्ग नगरपालिकेच्या हद्दीत राबविता येईल का या संदर्भात शासनाने नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने "ब" वर्ग नगरपालिकांचा सुद्धा समावेश करण्याबाबत आपली मते घ्यावीत असे समिती सुचित करीत आहे. याबाबत झालेला निर्णय त्वरीत समितीला कळवावा अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट एक
# अपूर्ण कामे

## जिल्हा गोषवारा

### प्रश्न क्रमांक :- 9 - अपुर्ण कामे (मागील तिमाही अखेर)

### काम सुरु झाल्यापासून जून 2011 रोजी अपूर्ण असलेल्या कामांचा यंत्रणा निहाय तपशील

| अ.क्रं. | यंत्रणेचे नाव | अपूर्ण कामांची संख्या | | | | अपूर्ण असल्याची कारणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 ते 5 वर्ष | 5 ते 10 वर्ष | 10 पेक्षा जास्त | एकुण | वन जमीन अभावी | भूसंपादन अभावी | सुधारीत अंदाजपत्रका अभावी | मजुरा अभावी | कुशल निधी अभावी | इतर कारणा मुळे | प्रगती पथावर | शेरा |
| 1 | 2 | 3 | | | | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | का.अ.ल.पा.(स्था) स्तर, नांदेड | 0 | 19 | 1 | 20 | 1 | 2 | 2 | 0 | 0 | 15 | 0 | |
| 2 | का.अ.नां.पा.वि.नांदेड | 0 | 0 | 4 | 4 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 3 | 0 | |
| 3 | का.अ.नां.ल. पा.वि.नांदेड | 0 | 0 | 13 | 13 | 2 | 1 | 7 | 0 | 0 | 3 | 0 | |
| 4 | का.अ.ल.पा.जि.प.नांदेड | 0 | 1 | 37 | 38 | 2 | 0 | 6 | 0 | 0 | 30 | 0 | |
| 5 | का.अ.जि.प.बां.(द) नांदेड | 0 | 0 | 29 | 29 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 26 | 2 | |
| 6 | का.अ.जि.प.बां.(उ) नांदेड | 0 | 37 | 7 | 44 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 44 | 0 | |
| 7 | का.अ.सां.बां.वि.नांदेड | 0 | 9 | 12 | 21 | 2 | 0 | 1 | 0 | 0 | 9 | 9 | |
| 8 | का.अ.सां.बां.वि.भोकर | 0 | 0 | 5 | 5 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | |
| | एकुण | 0 | 66 | 108 | 174 | 11 | 3 | 17 | 0 | 0 | 131 | 12 | |

प्रश्न क्रमांक :- 9 - अपुर्ण कामे (मागील तिमाही अखेर)

जून 2011 अखेर पर्यत

खालील तक्त्यात यंत्रणानिहाय माहिती देण्यात यावी

( 1 ते 5 वर्षावरील )

आकडे लाखात

| अ.क्रं. | यंत्रणानिहाय अपुर्ण कामांची संख्या | अपूर्ण कामाचे नाव व कामाचा प्रकार ( पाझर तलाव, गाव तलाव, मालगुजारी तलाव, वनतळी, रस्ते वनिकरण मृदसंधारण, कृषी (इत्यादी ) | मुळ अंदाज पत्रकानुसार कामाची किंमत किती होती | मुळ अंदाज पत्रकास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता मिळाल्याची तारीख (उदा. ता.मा/तारीख/ प्र.मा. तारीख) | | काम सुरु झाल्याची तारीख व काम बंद असल्यास त्याची तारीख (उदा. काम सुरु तारीख / काम बंद तारीख) | | आत्तापर्यत कामावर झालेला एकुण खर्च | कामे बंद वा अपूर्ण असण्याची कारणे ( उदा. भूसंपादना अभावी, मजुराअभावी, वन जमीन हरकत इत्यादी) | आयुक्त कार्यालयामार्फत कामावर झालेल्या एकुण खर्चाची व कामाची तपासणी करण्यात आली आहे काय व केंव्हा | अपूर्ण कामे कालबध्द कार्यक्रम आखून ती अग्रक्रमाने पूर्ण करण्याबाबत केलेली अथवा करावयाची उपाययोजना व त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता.मा.दिनांक | प्र.मा.दिनांक | काम सुरु तारीख | काम बंद तारीख | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | | 6 | | 7 | 8 | 8अ | 9 |
| 1 | निरंक | | | | | | | | | | |
| | | एकुण | 0 | | | | | 0 | | | |

प्रश्न क मांक : 9

जिल्हा नांदेड

## प्रश्न क्रमांक :- 9 - अपुर्ण कामे (मागील तिमाही अखेर)

### जून 2011 अखेर पर्यंत

### खालील तक्त्यात यंत्रणानिहाय माहिती देण्यात यावी

( 5 ते 10 वर्षावरील )

आकडे लाखात

| अ.क्र. | यंत्रणानिहाय अपुर्ण कामांची संख्या | | अपुर्ण कामाचे नाव व कामाचा प्रकार ( पाझर तलाव, गाव तलाव, मालगुजारी तलाव, वनतळी, रस्ते वनिकरण मृदसंधारण, कृषी (इत्यादी ) | मुळ अंदाज पत्रकानुसार कामाची किंमत किती होती | मुळ अंदाज पत्रकास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता मिळाल्याची तारीख (उदा. ता.मा/तारीख/ प्र.मा. तारीख) | | काम सुरु झाल्याची तारीख व काम बंद असल्यास त्याची तारीख (उदा. काम सुरु तारीख / काम बंद तारीख) | | कामे बंद वा अपुर्ण असण्याची कारणे ( उदा. भूसंपादना अभावी, मजुराअभावी, वन जमीन हरकत इत्यादी) | आत्तापर्यंत कामावर झालेला एकुण खर्च | अपुर्ण कामे कालबध्द कार्यक्रम आखून ती अग्रक्रमाने पूर्ण करण्याबाबत केलेली अथवा करावयाची उपाययोजना व त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ता.मा.दिनांक | प्र.मा.दिनांक | काम सुरु तारीख | काम बंद तारीख | | | |
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | | 6 | | 7 | 8 | 9 |
| 1 | का.अ.ल.पा. (स्था) स्तर, नांदेड (एकुण 19 कामे ) | 1 | चंद्रपुर पा.त.ता.किनवट | 11.51 | 30/01/03 | 19/02/03 | 19/05/03 | 06/01/05 | सुप्रमा अभावी | 6.44 | 6 /2012 पर्यत पुर्ण करण्यात येईल अपेक्षीत खर्च रु. 20.00 लक्ष |
| | | 2 | लिंगी पा.त.ता.किनवट | 20.73 | 18/01/03 | 11/4/03 | 28/03/04 | 03/03/05 | तात्पुरते वंद | 3.86 | ६/२०१२ पर्यत पूर्ण करणे प्रस्तावित.अपेक्षीत खर्च रु. २५.०० लक्ष |
| | | 3 | हरनमाळ पा.त.ता.मुखेड | 23.30 | 01/07/02 | 15/01/03 | 18/03/03 | 15/06/04 | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण | 17.55 | भौतिकदृष्टया काम पूर्ण |
| | | 4 | हतराळा पा.त.ता.मुखेड | 30.01 | 02/02/01 | 19/02/03 | 23/05/03 | 11/06/04 | तात्पुरते वंद | 18.98 | ६/२०१२ पर्यत पूर्ण करणे प्रस्तावित.अपेक्षीत खर्च रु. १६.५० लक्ष |
| | | 5 | लखमापूर पा. त ता.मुखेड | 26.58 | 15/02/03 | 12/05/04 | 04/01/05 | 05/02/07 | तात्पुरते वंद | 4.20 | ६/२०१२ पर्यत पूर्ण करणे प्रस्तावित.अपेक्षीत खर्च रु. ३०.०० लक्ष |
| | | 6 | वर्ताळा पा.त. ता.मुखेड | 21.95 | 09/11/01 | 15/01/03 | 16/03/03 | 21/06/04 | तात्पुरते बंद | 13.40 | ३/२०१२ पर्यत पूर्ण करणे प्रस्तावित.अपेक्षीत खर्च रु. ३०.०० लक्ष |
| | | 7 | हिब्बट पा. त ता.मुखेड | 22.2<br>28.85 | 10-05-2003<br>08.07.11 | 03/03/04 | 03/02/05 | काम पुर्ण | काम पुर्ण | 24.18 | भौतीक दृष्टयापुर्ण कुशल खर्च अदायकीसाठी अपेक्षीत रु ४.५० लक्ष |
| | | 8 | नरपटवाडी पा.त.ता.लोहा | 27.76 | 25/06/02 | 15/1/03 | 03/06/03 | 28/07/04 | तात्पुरते काम बंद | 3.36 | ६/२०१२ पर्यत काम पूर्ण करणे प्रस्तावित. अपेक्षीत खर्च रु. ६०.०० लक्ष |
| | | 9 | हिराबोरी तांडा पा.त.ता.लोहा | 34.40 | 18/03/02 | 15/01/03 | 15/03/03 | 29/07/04 | तात्पुरते काम बंद | 18.00 | ६/२०१२ पर्यत पूर्ण करण्यात येईल. अपेक्षीत खर्च रु. ३०.०० लक्ष |
| | | 10 | घुगेवाडी पा.त.ता.लोहा | 17.43 | 09/01/03 | 10/04/03 | 06/05/03 | 18/07/04 | तात्पुरते वंद | 5.53 | ६/२०१२ पर्यत पूर्ण करण्यात येईल. अपेक्षीत खर्च रु. २५.०० लक्ष |
| | | 11 | डोंगरगांव तांडा पा.त.ता.लोहा | 18.71 | 30/04/03 | 10/05/03 | 09/07/03 | 30/07/04 | तात्पुरते वंद | 2.03 | ६/२०१२ पर्यत पूर्ण करणे प्रस्तावित. अपेक्षीत खर्च रु. ३०.०० लक्ष |

प्रश्न क मांक : 9

जिल्हा नांदेड



| अ.क्र. | यंत्रणानिहाय अपुर्ण कामांची संख्या | | अपुर्ण कामाचे नाव व कामाचा प्रकार ( पाझर तलाव, गाव तलाव, मालगुजारी तलाव, वनतळी, रस्ते वनिकरण मृदसंधारण, कृषी (इत्यादी ) | मुळ अंदाज पत्रकानुसार कामाची किंमत किती होती | मुळ अंदाज पत्रकास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता मिळाल्याची तारीख (उदा. ता.मा/तारीख/ प्र.मा. तारीख) ता.मा.दिनांक | प्र.मा.दिनांक | काम सुरु झाल्याची तारीख व काम बंद असल्यास त्याची तारीख (उदा. काम सुरु तारीख / काम बंद तारीख) काम सुरु तारीख | काम बंद तारीख | कामे बंद वा अपूर्ण असण्याची कारणे ( उदा. भूसंपादना अभावी, मजुराअभावी, वन जमीन हरकत इत्यादी) | आतापर्यत कामावर झालेला एकुण खर्च | अपुर्ण कामे कालबध्द कार्यक्रम आखून ती अग्रक्रमाने पुर्ण करण्याबाबत केलेली अथवा करावयाची उपाययोजना व त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | | 6 | | 7 | 8 | 9 |
| | | 12 | वानोळा पा.त.ता.माहूर | 11.77 | 13/02/01<br>सु15/4/02 | 12/4/01<br>सु 22/6/03 | 13/05/01 | 07/07/01 | अकुशल काम पूर्ण. बुडीत क्षेत्रात अंदाजे १.२४ हे. वनजमिन येत आहे. | 7.75 | वन जमीन क्षेत्रास मंजूरी मिळाल्यानंतर काम करणे प्रस्तावित अथवा वन तलाव म्हणून वन खात्यास हास्तांतरीत करणे प्रस्तावित अपेक्षीत खर्च रु. ३०.०० लक्ष |
| | | 13 | मेंढकी पा.त. ता. माहुर | 12.40<br>17.87 | 26/09/01<br>सु24.3.08 | 25/4/02<br>सु13/06/08 | 16/06/02 | 28/3/03 | कंद भरणी स्तरावर | 13.45 | ६/२०१२पर्यंत काम पूर्ण करणे प्रस्तावित अपेक्षीत खर्च रु. 5.00 लक्ष |
| | | 14 | मुंगशी पा.त. ता माहूर | 19.44<br>24.75 | 26/9/01<br>सु24/1/08 | 23/4/02<br>सु9/03/08 | 12/12/02 | 01/01/05 | भौतिक दृष्टया काम पूर्ण | 24.02 | भौतिक दृष्टया काम पूर्ण |
| | | 15 | मांडवा पा.त. ता. माहूर | 18.61 | 13/06/00 | 25/4/01 | 09/05/01 | 23/11/01 | सुप्रमा अभावी | 10.95 | 6 / 2012 अखेर पूर्ण करणे प्रस्तावित अपेक्षीत खर्च रु. 25.00 लक्ष |
| | | 16 | तांदळा पा.त. ता माहुर | 13.49 | 18/01/03 | 19/02/03 | 24/03/03 | 27/06/04 | बुडित क्षेत्रात उच्चदाब विदयूत वाहिनी येत असल्यामुळे | 5.95 | विदयूत वाहिनी येत असल्यामुळे पर्यायी व्यवस्था करुन ६/२०१२ पर्यंत काम करणे प्रस्तावित अपेक्षित खर्च रु.२०.०० लक्ष |
| | | 17 | वोरी पा.त. ता कंधार | 16.12 | 29/11/01 | 15/1/03 | 16/03/03 | 27/05/10 | भौतिक दृष्टया काम पूर्ण | 8.98 | भौतीकदृष्टया काम पूर्ण कुशल देयक अदायगीसाठी अपेक्षित खर्च रू.10.00 लक्ष |
| | | 18 | दगडसांगवी पा.त. ता. कंधार | 16.66 | 25/01/02 | 15/01/03 | 16/02/03 | 26/07/04 | कंद भरणी स्तरावर | 18.04 | ६/२०१२ पर्यंत पूर्ण करणे प्रस्तवित अपेक्षित खर्च रु ५.०० लक्ष |
| | | 19 | पाथरड झिंझवाडी पांदन रस्ता ता. मुदखेड | 10.12 | 11/04/01 | 21/04/01 | 30/06/01 | 26/06/10 | भौतिक दृष्टया काम पूर्ण | 4.88 | भौतीकदृष्टया काम पूर्ण कुशल देयक अदायगीसाठी अपेक्षित खर्च रू.5.00 लक्ष |
| 2 | का.अ.ल.पा.जि.प. नांदेड (एकुण 1 कामे) | 20 | पा.त मोहीजा परांडा क्र 2 ता.कंधार | 49.81 | 10/04/03 | 30/04/03 | 24/05/03 | 16/04/04 | सुधारीत अंदाजपत्रकाअभावी | 25.59 | सुधारीत अंदाज पत्रक करणे चालू आहे.सदर काम जून 2012 पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. अपेक्षित खर्च रु 62.39 लक्ष |
| 3 | बांधकाम उत्तर विभाग जि.प.नांदेड (एकुण 37 कामे) | 21 | जो.र.कासारखेडा चिखली ता.नांदेड 0/0 ते 1/590 | 9.12<br>14.12 | 02/01/01<br>सु 17/12/09 | 23/01/01<br>सु 15/3/10 | 01/04/01<br>16/12/01<br>06/07/02 | 4/7/01<br>27/3/02<br>16/9/02 | कुशल कामे बाकी | 4.07 | मातीकाम पूर्ण , सोलिंग ८०० मीटर पूर्ण मार्च -२०१२ अखेर पूर्ण करण्यांचे नियोजीत आहे.अपेक्षित खर्च रु १०.०५ लक्ष |

प्रश्न क मांक : 9

जिल्हा नांदेड

| अ.क्रं. | यंत्रणानिहाय अपुर्ण कामांची संख्या | अपूर्ण कामाचे नाव व कामाचा प्रकार ( पाझर तलाव, गाव तलाव, मालगुजारी तलाव, वनतळी, रस्ते वनिकरण मृदसंधारण, कृषी (इत्यादी ) | | मुळ अंदाज पत्रकानुसार कामाची किंमत किती होती | मुळ अंदाज पत्रकास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता मिळाल्याची तारीख (उदा. ता.मा/तारीख/ प्र.मा. तारीख) | | काम सुरु झाल्याची तारीख व काम बंद असल्यास त्याची तारीख (उदा. काम सुरु तारीख / काम बंद तारीख) | | कामे बंद वा अपूर्ण असण्याची कारणे ( उदा. भूसंपादना अभावी, मजुराअभावी, वन जमीन हरकत इत्यादी) | आत्तापर्यंत कामावर झालेला एकुण खर्च | अपूर्ण कामे कालबध्द कार्यक्रम आखुन ती अग्रक्रमाने पूर्ण करण्याबाबत केलेली अथवा करावयाची उपाययोजना व त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ता.मा.दिनांक | प्र.मा.दिनांक | काम सुरु तारीख | काम बंद तारीख | | | |
| 1 | 2 | 3 | | 4 | 5 | | 6 | | 7 | 8 | 9 |
| | | 22 | पांदन रस्ता सुगांव वोरगांव किमी 0/0 ते 2/420 ता.नांदेड | 10.75 | 19/01/01 | 13/06/01 | 16/05/02 | 31/5/02 | कुशल कामे वाकी | 2.84 | मातीकाम पूर्ण , जाने-२०१२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजीत आहे.अपेक्षित खर्च रु १८.९० लक्ष |
| | | | | | | | 01/08/02 | 31/8/02 | | | |
| | | | | 21.74 | सु 17/12/09 | सु 15/3/10 | 01/10/02 | 31/12/02 | | | |
| | | | | | | | 06/06/03 | 4/7/2004 | | | |
| | | 23 | जो.र.वाभूळगांव ते वाभूळगांवतांडा किमी 0/0 ते 2/100 ता.नांदेड | 9.54 | 04/12/01 | 22/02/03 | 22/03/03 | 01/07/03 | | 1.90 | मातीकाम पूर्ण , एप्रिल-२०१२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजीत आहे.अपेक्षित खर्च रु १३.५८ लक्ष |
| | | | | 15.48 | सु 17/12/09 | सु 15/3/10 | | | | | |
| | | 24 | पांदन रस्ता शितलादेवी वारड नागेली किमी 0/0 ते 3/575 ता.मुदखेड | 12.89 | 31/03/01 | 21/05/01 | 10/05/03 | 15/06/03 | जमीनवाद ( पांदन रस्ता ) | 0.06 | १०% पेक्षा कमी खर्च |
| | | 25 | जो.र.वारड खैरगांव शिवरस्ता किमी 0/0 ते 1/500 ता.मुदखेड | 5.98 | 31/03/01 | 18/05/01 | 10/05/03 | 16/06/03 | जमीनवाद ( पांदन रस्ता ) | 0.06 | १०% पेक्षा कमी खर्च |
| | | 26 | अंतर्गत रस्ता पेवा किमी 0/0 ते 1/00 ता.हदगांव | 2.46 | 22/11/99 | 09/02/00 | 01/03/01 | 1/6/2001 | भौतिक दृष्टया पूर्ण | 1.53 | भौतिक दृष्टया पूर्ण |
| | | | | | | | 01/03/04 | 28/03/04 | | | |
| | | 27 | अंतर्गत रस्ता निवघा किमी 0/0 ते 1/200 ता. हदगांव | 2.72 | 05/07/00 | 04/10/00 | 16/04/01 | 8/5/2001 | भौतिक दृष्टया पूर्ण | 1.19 | भौतिक दृष्टया पूर्ण |
| | | | | | | | 07/08/03 | 31/08/03 | | | |
| | | 28 | जो.र.शेंदन राळवाडी ता.हदगांव 0/0 ते 2/700 | 10.65 | 19/01/01 | 22/02/02 | 16/05/02 | 31/12/02 | जमीन वाद 2/00 ते 2/500 | 5.65 | २.५० कि.मी. मातीकाम व दगडगोळा पूर्ण , जमीनवाद २/०० ते २/५०० |
| | | | | | | | 16/09/03 | 15/12/03 | | | |
| | | | | | | | 24/02/05 | 15/03/05 | | | |
| | | 29 | जो.र.लोहा लहान तांडा ता.हदगांव 0/0 ते 3/300 | 13.07 | 19/01/01 | 22/02/01 | 16/03/01 | 11/01/03 | कुशल कामे वाकी | 5.71 | मातीकाम व सोलिंग पूर्ण , मार्च २०१२ अखेर पूर्ण करण्यांचे नियोजीत आहे.अपेक्षित खर्च रु ७.३६ लक्ष |
| | | 30 | अंतर्गत रस्ता शामराव नाईकतांडा ता.हदगांव 0/0 ते 1/00 | 2.44 | 04/06/01 | 13/06/01 | 05/06/03 | 30/10/03 | भौतिकदृष्टया पुर्ण | 0.78 | भौतिकदृष्टया पुर्ण |
| | | 31 | अंतर्गत रस्ता येवलीतांडा ता.हदगांव 0/0 ते 0/900 | 2.77 | 04/06/01 | 30/06/01 | 17/03/03 | 30/04/04 | भौतिकदृष्टया पुर्ण | 0.98 | भौतिकदृष्टया पुर्ण |

प्रश्न क मांक : 9

जिल्हा नांदेड

| अ.क्र. | यंत्रणानिहाय अपुर्ण कामांची संख्या | अपूर्ण कामाचे नाव व कामाचा प्रकार ( पाझर तलाव, गाव तलाव, मालगुजारी तलाव, वनतळी, रस्ते वनिकरण मृदसंधारण, कृषी (इत्यादी ) | | मुळ अंदाज पत्रकानुसार कामाची किंमत किती होती | मुळ अंदाज पत्रकास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता मिळाल्याची तारीख (उदा. ता.मा/तारीख/ प्र.मा. तारीख) | | काम सुरु झाल्याची तारीख व काम बंद असल्यास त्याची तारीख (उदा. काम सुरु तारीख / काम बंद तारीख) | | कामे बंद वा अपूर्ण असण्याची कारणे ( उदा. भूसंपादना अभांवी, मजुराअभावी, वन जमीन हरकत इत्यादी) | आत्तापर्यत कामावर झालेला एकुण खर्च | अपूर्ण कामे कालबध्द कार्यक्रम आखून ती अग्रक्रमाने पूर्ण करण्याबाबत केलेली अथवा करावयाची उपाययोजना व त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ता.मा.दिनांक | प्र.मा.दिनांक | काम सुरु तारीख | काम बंद तारीख | | | |
| 1 | 2 | 3 | | 4 | 5 | | 6 | | 7 | 8 | 9 |
| | | 32 | अंतर्गत रस्ता उंचाडा ता.हदगांव 0/0 ते 0/800 | 2.31 | 10/03/98 | 18/03/99 | 18/03/00 | 31/05/01 | भौतिकदृष्ट्या पुर्ण | 0.39 | भौतिकदृष्ट्या पुर्ण |
| | | 33 | अंतर्गत रस्ता करमोडी ता.हदगांव 0/0 ते 0/600 ता. हदगांव | 1.90 | 03/03/00 | 13/02/01 | 20/02/03 | 31/03/03 | भौतिकदृष्ट्या पुर्ण | 0.66 | भौतिकदृष्ट्या पुर्ण |
| | | | | | | | 19/12/03 | 21/01/04 | | | |
| | | 34 | अंतर्गत रस्ता कोळी ता.हदगांव 0/0 ते 0/600 | 1.59 | 14/10/99 | 13/02/01 | 01/03/01 | 31/03/01 | भौतिकदृष्ट्या पुर्ण | 0.38 | भौतिकदृष्ट्या पुर्ण |
| | | 35 | अंतर्गत रस्ता कोथळा ता.हदगांव 0/0 ते 1/500 | 4.49 | 04/06/01 | 16/06/01 | 02/01/02 | 07/02/02 | कुशल काम बाकी | 0.33 | १० % पेक्षा कमी खर्च |
| | | 36 | अंतर्गत रस्ता बनचिंचोली ता.हदगांव 0/0 ते 2/00 | 5.49 | 08/02/01 | 09/03/01 | 16/04/01 | 15/12/01 | भौतिकदृष्ट्या पुर्ण | 1.85 | भौतिकदृष्ट्या पुर्ण |
| | | 37 | अंतर्गत रस्ता गारगव्हाण ता.हदगांव 0/0 ते 0/600 | 1.45 | 23/02/00 | 09/03/00 | 17/12/00 | 31/01/01 | भौतिकदृष्ट्या पुर्ण | 0.39 | भौतिकदृष्ट्या पुर्ण |
| | | 38 | जुने ते नविन गांवठान आडा ता.हदगांव 0/0 ते 2/00 | 8.35 | 22/11/99 | 10/05/00 | 16/11/00 | 30/11/02 | कुशल कामे बाकी | 4.50 | मातीकाम व सोलिंग पूर्ण , फेब्रुवारी २०१२ अखेर पूर्ण करण्याचें नियोजीत आहे.अपेक्षित खर्च रु ११.३० लक्ष |
| | | | | 15.80 | सु 17/12/09 | सु 20/4/10 | | | | | |
| | | 39 | अंतर्गत रस्ता मंगरुळ ता.हिमायतनगर 0/0-1/500 | 3.69 | 22/11/99 | 17/05/00 | 01/01/01 | 31/01/01 | भौतिकदृष्ट्या पुर्ण | 1.14 | भौतिकदृष्ट्या पुर्ण |
| | | | | | | | 17/02/01 | 29/06/01 | | | |
| | | 40 | अंतर्गत रस्ता ताडाचीवाडी ता.हिमायतनगर 0/0-0/350 | 0.94 | 07/02/01 | 26/05/01 | 05/06/03 | 16/06/03 | कुशल काम बाकी | 0.08 | १० % पेक्षा कमी खर्च |
| | | 41 | अंतर्गत रस्ता रमणवाडी ता.हिमायतनगर 0/0-0/410 | 1.11 | 07/02/01 | 26/06/01 | 05/06/03 | 05/10/03 | भौतिकदृष्ट्या पुर्ण | 0.56 | भौतिकदृष्ट्या पुर्ण |
| | | 42 | अंतर्गत रस्ता भिश्याची वाडी ता.हिमायतनगर 0/0-0/270 | 0.74 | 07/02/01 | 26/06/01 | 05/06/03 | 16/06/03 | कुशल काम बाकी | 0.08 | १० % पेक्षा कमी खर्च |
| | | 43 | अंतर्गत रस्ता वाळक्याचीवाडी ता.हिमायतनगर 0/0-1/200 | 3.25 | 15/11/99 | 02/02/01 | 16/03/01 | 22/07/01 | भौतिकदृष्ट्या पुर्ण | 1.14 | भौतिकदृष्ट्या पुर्ण |

प्रश्न क मांक : 9

जिल्हा नांदेड

| अ.क्रं. | यंत्रणानिहाय अपुर्ण कामांची संख्या | | अपूर्ण कामाचे नाव व कामाचा प्रकार ( पाझर तलाव, गाव तलाव, मालगुजारी तलाव, वनतळी, रस्ते वनिकरण मृदसंधारण, कृषी (इत्यादी ) | मुळ अंदाज पत्रकानुसार कामाची किंमत किती होती | मुळ अंदाज पत्रकास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता मिळाल्याची तारीख (उदा. ता.मा/तारीख/ प्र.मा. तारीख) | | काम सुरु झाल्याची तारीख व काम बंद असल्यास त्याची तारीख (उदा. काम सुरु तारीख / काम बंद तारीख) | | कामे बंद वा अपूर्ण असण्याची कारणे ( उदा. भूसंपादना अभावी, मजुराअभावी, वन जमीन हरकत इत्यादी) | आत्तापर्यत कामावर झालेला एकुण खर्च | अपूर्ण कामे कालबध्द कार्यक्रम आखून ती अग्रक्रमाने पूर्ण करण्याबाबत केलेली अथवा करावयाची उपाययोजना व त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ता.मा.दिनांक | प्र.मा.दिनांक | काम सुरु तारीख | काम बंद तारीख | | | |
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | | 6 | | 7 | 8 | 9 |
| | | 44 | अंतर्गत रस्ता रामनाईकतांडा ता.हिमायतनगर 0/0-0/620 | 1.78 | 09/03/01 | 18/06/01 | 05/06/03 | 05/07/03 | भौतिकदृष्टया पुर्ण | 0.26 | भौतिकदृष्टया पुर्ण |
| | | 45 | जोडरस्ता पोटा ते वटफळी ता.हिमायतनगर 0/0-0/700 | 3.65 | 09/03/01 | 18/06/01 | 05/06/03 | 09/09/03 | कुशल कामे बाकी | 0.71 | मातीकाम पूर्ण, एप्रिल २०१२ अखेर पूर्ण करण्यांचे नियोजीत आहे.अपेक्षित खर्च रू २.९४ लक्ष |
| | | 46 | जोडरस्ता दावदरी ते सिध्देश्वर मंदिर ता.हिमायतनगर 0/0-1/00 | 5.20 | 24/05/01 | 30/06/01 | 05/06/03 | 01/07/03 | कुशल कामे बाकी | 0.27 | १०% पेक्षा कमी खर्च |
| | | 47 | जोडरस्ता वटफळी ते सातशिव मंदिर ता.हिमायतनगर 0/0 ते 0/700 | 3.40<br>8.98 | 09/03/01<br>सु 17/12/09 | 13/06/01<br>सु 20/4/10 | 01/06/03 | 08/12/03 | कुशल कामे बाकी | .0.82 | मातीकाम पूर्ण, जानेवारी २०१२ अखेर पुर्ण करण्यांचे नियोजीत आहे.अपेक्षित खर्च रू ८.१६ लक्ष |
| | | 48 | पांदन रस्ता बोरगांव ते टाकराळा ता.हिमायतनगर 0/0-0/640 | 3.40<br>7.90 | 09/03/01<br>सु 17/12/09 | 18/06/01<br>सु 20/4/10 | 05/06/03 | 15/01/04 | कुशल कामे बाकी | 0.98 | मातीकाम पूर्ण, मार्च-२०१२ अखेर पूर्ण करण्यांचे नियोजीत आहे.अपेक्षित खर्च रू ६.९२ लक्ष |
| | | 49 | अंतर्गत रस्ता पाळज ता.भोकर 0/0-1/600 | 4.46 | 01/12/00 | 13/06/01 | 06/06/03 | 31/05/04 | भौतिकदृष्टया पूर्ण | 2.38 | भौतिकदृष्टया पूर्ण |
| | | 50 | अंतर्गत रस्ता नांदातांडा ता.भोकर 0/0-0/500 | 1.38 | 01/12/00 | 24/06/01 | 09/06/03 | 14/04/04 | भौतिकदृष्टया पूर्ण | 1.19 | भौतिकदृष्टया पूर्ण |
| | | 51 | अंतर्गत रस्ता दुर्गानगर तांडा ता.उमरी 0/00-0/800 | 2.16 | 01/12/00 | 24/06/01 | 20/06/03 | 15/05/04 | भौतिकदृष्टया पूर्ण | 1.19 | भौतिकदृष्टया पूर्ण |
| | | 52 | अंतर्गत रस्ता रामखडक ता.उमरी 0/00-0/420 | 1.30 | 01/12/00 | 12/06/01 | 11/06/03 | 15/05/04 | भौतिकदृष्टया पूर्ण | 0.99 | भौतिकदृष्टया पूर्ण |
| | | 53 | अंतर्गत रस्ता पांगरी तांडा ता.किनवट 0/0-1/00 | 3.15 | 02/05/00 | 03/10/00 | 01/12/00 | 15/06/01 | भौतिकदृष्टया पूर्ण | 1.88 | भौतिकदृष्टया पूर्ण |
| | | 54 | अंतर्गत रस्ता कोल्हारी ता.किनवट 0/00-0/800 | 2.18 | 11/01/01 | 22/02/01 | 17/01/01 | 15/06/01 | भौतिकदृष्टया पूर्ण | 0.47 | भौतिकदृष्टया पूर्ण |
| | | 55 | अंतर्गत रस्ता वझरा ता.किनवट 0/00-0/750 | 1.94 | 18/08/00 | 04/10/00 | 20/03/01 | 08/04/01 | भौतिकदृष्टया पूर्ण | 0.12 | भौतिकदृष्टया पूर्ण |
